## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २४.०१.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ४९ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४९ वी बैठक गुरूवार दिनांक २४.०१.२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. कामगार आयुक्त, यांचे कार्यालय, बांद्रा पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. धनंजय माळी | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित) |
| ९. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**बैठकीचे इतिवृतांत**

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले. सदर इतिवृत्तांतातील ठरावात काही बदल करावयाचे असल्यास तसे सुचवावे त्यासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे, अशी विनंती मंडळ सचिव यांनी केली.

मंडळाच्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव ४९(१)/२०१९: मंडळाच्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. २: सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया बॅंकेने मंडळाकडे जमा होणा-या उपकराकरीता विकसित केलेल्या प्रणालीचे सादरीकरण करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाने दि. २२.०९.२०१७ रोजी मंजुर ठराव क्र. १४ अन्वये भारतीय स्टेट बॅक ऑफ इंडियामध्ये खाते उघडण्यासाठी दिलेल्या मान्यतेत बदल करून सेंट्रल बॅक ऑफ इंडियामध्ये मंडळाचे नवीन बचत खाते उघडण्यास मान्यता तसेच त्याअनुषंगाने प्रणली व इतर कामासाठी येणा-या खर्चास व सदर बॅंकेसोबत Service Level Agreement (SLA) करण्यास मान्येतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला होता.

**"विषय क्र. ११: नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी / नुतणीकरणाची फी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी नवीन बॅंक खाते उघडणेबाबत दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावात सुधारणा करून स्टेट बॅंक ऑफ इंडिया ऐवजी सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया (Central Bank of India) मध्ये मंडळाचे खाते उघडण्यात यावे. सदर बदल क्षेत्रीय कार्यालयांना त्वरीत कळविण्यात यावा. तसेच मंडळाची इतर बॅंकामध्ये असणारी खाती बंद करण्यात येऊन आवश्यक असणारी खाती सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया मध्ये उघडण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."**

मंडळाकडून सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, बांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१ मध्ये नोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणी / मासिक वर्गणी व आस्थापनांकडून जमा होणारा उपकर जमा करण्यासाठी उपकरासाठी बॅंक खाती उघडण्यात आली आहेत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | खाते प्रकार | खाते क्र. |
|---|---|---|---|
| १ | उपकर जमा | चालू | ३६७११७८५९१ |
| २ | मंडळाचा खर्च | बचत | ३७२२४१६२६९ |
| ३ | कामगारांची नोंदणी फी | बचत | ३२३०८२१८६४ |
| ४ | कामगारांची मासिक वर्गणी | बचत | ३१४३०४४४८८ |

उपकर निधी, नोंदणी फी व मासिक वर्गणीच्या रक्कमा जमा करण्यासाठी उघडण्यात आलेल्या बॅंक खात्यांना मंडळाची मान्यता प्रस्तावित आहे.

सर्व आस्थापनांनी बँकेत जाऊन भरणा केलेल्या उपकर रक्कमांचा तपशील नोंदविण्यासाठी तसेच ऑनलाईन पध्दतीने उपकर जमा करण्यासाठी प्रणाली विकसित करण्याकरिता आवश्यक माहिती मंडळाकडून या बँकेस देण्यात आली. या संदर्भात मंडळाच्या अधिकारी, सल्लागार व बँकेचे प्रतिनिधी यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या होत्या.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून सर्व आस्थापनांनी बँकेत जाऊन भरणा केल्यास त्यांच्या तपशीलाची नोंद घेण्यासाठी व आस्थापनांनी उपकर रक्कमा ऑनलाईन पध्दतीने भरणा करण्यासाठी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. आस्थापनांनी भरणा केलेल्या उपकराच्या रक्कमा हया या बँकेच्या सर्व शाखांमार्फत स्विकारल्या जात असतांना प्रणाली मध्ये नोंदविल्या जाणार आहेत. या व ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणा-या रक्कमांचा तपशील (MIS) सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून मंडळास सादर केला जाणार आहे. या MIS मुळे खालील फायदे अपेक्षित आहेत.

१. उपकराची रक्कम भरणा करणा-या आस्थापनाचे नांव, पत्ता, बांधकाम करणा-या प्रत्येक संस्थेचे नांव, पत्ता, प्रकल्प / योजना, बांधकामाचे एकूण मुल्य (जमिनीचे मुल्य वगळून) याबाबतचा तपशील उपलब्ध होईल.
२. जमा उपकराची माहिती/तपशील मंडळास विभाग, आस्थापना, महानगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, बांधकाम कंत्राटदार/ कंपनी, योजना / प्रकल्प निहाय व कालावधी निहाय उपलब्ध होईल.
३. जमा उपकर रक्कमेचा तपशील उपलब्ध होणार असल्याने जमा उपकर रक्कमेचे योग्यरित्या वित्तीय व्यवस्थापन करता येईल.
४. उपकराचा भरणा न करणा-या आस्थापनांचा शोध घेता येईल व उपकर वसुलीबाबत कार्यवाही करता येईल.
५. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बीकेसी शाखा बांद्रा (पूर्व) कडून MIS व चलनाच्या प्रती प्राप्त होणार असल्याने त्याआधारे जमा उपकराची पडताळणी (Reconciliation) करता येईल.
६. सुधारित चलन नमुन्या अन्वये उपकर भरणा करणा-या आस्थापनेची संपूर्ण माहिती उपलब्ध होईल.
७. बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, इ. कार्यालयाकडून बांधकामांच्या विविध योजनांना मंजूरी देतांना तसेच बांधकामाच्या देयकांतून / प्रदानातून उपकराची वसूली करून त्याचा एकत्रित भरणा (Bulk remittance) मंडळास करण्यात येत आहे. याकरिता त्या कार्यालयांकडे सध्या वापरात येत असलेल्या प्रणाली / पध्दती पाहून त्यांस पूरक अशी प्रणाली (Compatible) सेंट्रल बँक ऑफ इंडिया कडून तयार करून दिली जाणार आहे. जेणेकरून या कार्यालयांकडून ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने उपकर वसुलीचा तपशील बँकेस प्रणालीमध्ये अपलोड करता येईल.

८. उपकराच्या चलनांच्या प्रती सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध शाखेतून बी. के. सी. बांद्रा (पूर्व) येथील नोडल शाखेत प्राप्त होतील व त्या एकत्रितरित्या मंडळ मुख्यालयास प्राप्त होतील. तसेच या प्रणालीत वेळोवेळी आवश्यक बदल/अपग्रेडेशन करणे तसेच ती व्यवस्थित सुरू राहण्यासाठी त्याचे परिरक्षणही बँकेकडून केले जाणार आहे.

याबाबत सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकारी यांचेकडून या उपकराकरीता विकसित केलेल्या प्रणालीचे सादरीकरण मंडळ बैठकीत करण्यात येत आहे.

मंडळाच्या मान्यतेनंतर सेंट्रल बँक ऑफ इंडिया सोबत Service level Agreement (SLA) करण्यात येईल. बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने उपकर जमा करण्याकरिता विकसित प्रणाली कार्यान्वीत करण्यात येईल व उपकर जमा करणाऱ्या सर्व आस्थापना मधील उपकर संकलक, उपकर निर्धारण अधिकारी व उपकर अपिलीय अधिकारी यांना बँक खात्यामधील बदल व विकसित केलेली प्रणालीच्या कार्यपध्दतीबाबत मंडळ स्तरावरून कळविण्यात येईल. यासाठी आवश्यक प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल .तसेच, शासनस्तरावरूनही परिपत्रकाद्वारे सर्व विभागांना तशा सविस्तर सूचना देणेबाबत शासनास विनंती करण्यात येईल.

वरील प्रमाणे कार्यवाहीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(२)/२०१९: १) मंडळाच्या ठरावानुसार सेंट्रल बँक ऑफ इंडिया (Central Bank Of India), या बँकेमार्फत उपकर जमा करणेसाठी विकसित संगणकीय प्रणाली विकसित करावयाच्या कार्यवाहीस व संबंधित बँकेसोबत Service Level Agreement (SLA) करून कार्यन्वित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, मंडळाकडून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी.के.सी. शाखा, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे उघडण्यात आलेल्या खालील बँक खात्यांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | तपशील | खाते प्रकार | खाते क्र. |
|---|---|---|---|
| १ | उपकर जमा | चालू | ३६७११७८५९१ |
| २ | मंडळाचा खर्च | बचत | ३७२२४१६२६९ |
| ३ | कामगारांची नोंदणी फी | बचत | ३२३०८२१८६४ |
| ४ | कामगारांची मासिक वर्गणी | बचत | ३१४३०४४४८८ |

**२. उपकर जमा करणा-या सर्व आस्थापना मधील उपकर संकलक, उपकर निर्धारण अधिकारी व उपकर अपिलीय अधिकारी यांना बँक खात्यामधील बदल, सुधारित चलन नमुना व विकसित प्रणालीच्या कार्यपध्दतीबाबत मंडळ स्तरावरून कळविण्यात यावे.**

तसेच, शासन स्तरावरूनही सर्व संबंधितांना कळविणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

३. सदर संगणकीय कार्यप्रणालीच्या कार्यवाहीसाठी तसेच बँक, उपकर संकलक, उपकर निर्धारक, उपकर अपिलीय अधिकारी, आस्थापना यांचेसोबत समन्वयासाठी ०३ अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र कक्ष मुख्यालयात स्थापन करण्यात यावा.

४. सदर कार्यप्रणालीबाबत आवश्यक प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.

वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला

| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
|---|---|

**विषय क्र.०३ :- एचएलएल लाईफ केयअर लिमिटेड (केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम) मार्फत नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांचे आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आजारावरील औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात असे निदर्शनास आले आहे.

मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ ओळखपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. तथापि, काही बांधकाम कामगारांना सदर योजनेबाबत व उपचाराबाबतच्या पध्दतीची सविस्तर माहिती नसल्यामुळे बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेऊ शकले नाही असे निदर्शनास आले. यास्तव बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून ज्या बांधकाम कामगारांना आजार असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार करणे प्रस्तावित आहे. बांधकाम कामगारांच्या आरोग्याची तपासणी वेळीच होऊन निदर्शनास आलेल्या आजारावर वेळीच उपचार केल्यास बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही. या उद्देशाने बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्य तपासणी करणे या विषयाबाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळामार्फत कॅम्प आयोजित करून सदर कॅम्पमध्ये आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्य तपासणीत आढळून येणाऱ्या गंभीर आजाराबाबत करावयाची उपाययोजना बाबतचा आराखडा तयार करावा. आरोग्य तपासणीकरीता त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून या क्षेत्रातील काम करणाऱ्या मे.क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून मंडळास सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या योजनेचे सादरीकरण मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत दिंनाक

२१.०३.२०१८ रोजी च्या बैठकीत करण्यात आले. सदर सादरीकरणानंतर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर आरोग्य तपासणी पथकामध्ये समाविष्ट डॉक्टर संख्या, त्यांचेकडे उपलब्ध तपासणीचे साहित्य,औषधे,तपासणीस लागणारा वेळ, तपासणीचे घटक त्यानुसार कोणत्या आजाराचे निदान होवू शकेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करावा. बांधकाम कामगाराच्या कामाच्या स्वरुपास अनुसरून निदर्शनास येणाऱ्या आजारांचा मुख्यत्वेकरून आरोग्य तपासणीत समावेश करण्यात यावा. सदर योजना प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्वावर एका जिल्ह्यात राबविण्यातयावीत. तद्नंतर आरोग्य तपासणी योजना राज्यातील इतर जिल्ह्यात राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणेया संस्थेने सुधारित प्रस्ताव मंडळास सादर केला व मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी आरोग्य तपासणीबाबत मंडळाच्या दि. २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत सादरीकरण केले. सदर सादरीकरणाअंती मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी एकाच वेळी महाराष्ट्रात किती ठीकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करू शकता अशी विचारणा केली. मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडे सध्या १० टीम तयार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**४६(१२)/२०१८ ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणीबाबत मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणेया संस्थेने केलेल्या सादरीकरणाच्या प्रस्तावास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर योजनेचे RFP Document e-Gov Consultant मे. केपीएमजी यांच्याकडून करून घेण्यात यावे व योजना मंजूरीचा प्रस्ताव व RFP Document शासन मान्यतेस सादर करण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

दरम्यानच्या कालावधीत मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेने मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणीकरीता दि.११.०१.२०१९ रोजी मंडळ कार्यालयास प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालीलप्रमाणे :-

१. मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड ही संस्था केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण अंतर्गत केंद्र शासनाचे एंटरप्राईस आहे.
२. महाराष्ट्रामध्ये मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेच्या सर्व सोयी सुविधायुक्त ९३ प्रयोगशाळा "HINDLABS" या नावाने कार्यरत आहे. (प्रत्येक जिल्हयात ०३ ते ०४)

३. सदर संस्थेच्या ९३ प्रयोगशाळेमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य विभागांतर्गत २३०१ ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य संस्थांमधील रुग्णांना आरोग्य तपासणीची सेवा पुरविण्यात येत आहे.

४. सदर संस्थेकडे आरोग्य तपासणी करीता आवश्यक डॉक्टर, पॅरामेडिकल स्टाफ व हेल्थ वर्कर्सची स्वतंत्र टीम उपलब्ध आहे.

५. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची कामाच्या ठिकाणी किंवा जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेमध्ये तपासणी करणे प्रस्तावित आहे.

6. सर्व साधारण कामगारांकरीता खालीलप्रमाणे आरोग्य तपासणी प्रस्तावित आहे.

1. Physical Examination (Head to Bottom)
2. CBC
3. Blood Sugar
4. Liver Function Test
5. Renal Function Test
6. Lipid Profile
7. Malaria Parasite
8. ESR
9. Urine Test
10. Occupational History
11. Social History
12. Family History
13. Lung Function Test
14. Audio Screening Test
15. Vision Screening
16. Snellen General Employees
17. Fit for employment Certificates
18. Individual Reports
19. Excutive Company Reports
20. Baseline Medicals-2 X Audio Test
21. General medicals is done by- Occupational Health Nurse
22. Medicals is reviewed by- Occupational health Practitioner

७. संस्थेने आरोग्य तपासणी फी संदर्भात सादर केलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

| Category | Package | Cost/Individual + Taxes |
|---|---|---|
| 1. | General workers- Employees working on the ground not higher than 1.5 , | Rs.1500/- |
| 2. | Working on Heights Medical Examination- | Rs 1500/ |

| | | |
|---|---|---|
| | Employees working higher than 1.5 m | |
| 3. | Drivers, Operators and PDP Medicals | Rs. 1500/- |

मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेची महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रूग्णालयातील रूग्णांची आरोग्य तपासणी करण्याकरीता नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेचे ९३ ठिकाणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. २३०१ आरोग्य संस्थेतील रूग्णांची तपासणी करण्यात येत आहे. संस्थेकडे आरोग्य तपासणीबाबतची अद्यावत संगणक प्रणाली उपलब्ध आहे. सदर प्रणालीद्वारे तपासणीचा अहवाल ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्याची सुविधा संस्थेकडे उपलब्ध आहे. उपरोक्त प्रस्तावासंदर्भात संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात आले.

सदर सादरीकरणानंतर चर्चेत सहभागी होताना मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, आरोग्याची तपासणी बाबतचा प्रस्ताव योग्य आहे. तथापि, सदर तपासणी बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास आल्यास त्या बांधकाम कामगारांवर उपचार होणे आवश्यक आहे. या संदर्भात मा. प्रधान सचिव यांनी मत व्यक्त केले की, आरोग्य तपासणी व आजारावरील उपचार या दोन्ही भिन्न बाबी आहेत. बांधकाम कामगारांच्या आजारावरील उपचाराकरीता मंडळामार्फत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर चर्चेत सहभागी होताना मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी निर्देश दिले की, आरोग्य तपासणी करीता नेमावयाच्या संस्थेने आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येईल अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराकरीता जवळच्या रुग्णालयात भरती करावे व सदर योजनेंतर्गत नियुक्त आरोग्य मित्र यांचेमार्फत सदर बांधकाम कामगारांना संपूर्ण उपचार होऊन तो बरा होईल तोपर्यंत पाठपुरावा करावा. या संदर्भात मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त करावा.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(३)/२०१९: नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीकरीता मे. एचएलएल लाईफकेअर लि. यांनी प्रस्तावित केलेल्या आरोग्य तपासणीच्या कार्यवाही शिवाय सदर संस्थेने बांधकामाच्या ठिकाणी कॅम्प आयोजित करून नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करावी. बांधकामाच्या ठिकाणी आयोजित कॅम्पमध्ये उपस्थित ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नाही त्या बांधकाम कामगारांचे**

नोंदणीकरीता आवश्यक कार्यवाही करावी. सदर आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येतील अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नियुक्त केलेल्या आरोग्य मित्रा मार्फत जवळच्या रुग्णालयात भरती करून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेवर सोपविण्यात यावी, याबाबतची कार्यवाही, आरोग्य तपासणीच्या अतिरिक्त बाबी, कॅम्पपूर्व व कॅम्पनंतरची कार्यवाही त्यानुसार आरोग्य तपासणीचे दर याबाबतचा सुधारित प्रस्ताव मे. एचएलएल लाईफकेअर लि.या संस्थेकडून मागविण्यात यावा, सदर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०४ :- नोंदीत बांधकाम कामगारांकरीता कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) मार्फत कस्टमाईज्ड वेलनेस प्लॅन (Helath) राबविणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी डिजीटल इंडिया यांनी त्यांच्या दि.१९.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना राज्यातील कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) मार्फत कस्टमाईज्ड वेलनेस प्लॅन (Helath)उपलब्ध करून देणेबाबत मा. मंत्री महोदय कामगार विभाग यांना प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे.(प्रत संलग्न)

केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी या विभागाकडून कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC)चे Special Purpose Vehical (SPV) म्हणून संस्था स्थापन करून त्याची नोंदणी कारखाने अधिनियम १९५६ अंतर्गत करण्यात आलेली आहे. केंद्र शासनामार्फत कॉमन सर्व्हिस सेंटरच्या कामकाजावर देखरेख करण्यात येते व नागरिकांना विविध सेवा पुरविण्यात येते.कॉमन सर्व्हिस सेंटर स्थानिक, कुशल संस्थामार्फत (skilled Enterprenur) चालविल्या जातात. सदर केंद्रामार्फत Digital littercy, शैक्षणिक सेवा, टेलि मेडीसिन, आरोग्य सेवा अशा विविध सेवा ग्रामीण भागातील जनतेसाठी पुरविण्यात येतात.

मे. डिजीटल इंडिया या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार राज्यातील नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना कॉमन सर्व्हिस सेंटर मार्फत होमिओपॅथीचा उपचार व औषधी पुरविणे प्रस्तावित आहे. प्रस्तावातील ठळक बाबी खालील प्रमाणे :-

१. नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांनाकॉमन सर्व्हिस सेंटर कडे नोंदणी झाल्यांनतर एका वर्षाच्या कालावधील १०वेळा सल्ला (Consultation) देण्यात येईल.
२. कुटूंबाच्या सर्व सदस्यांना संपूर्ण वर्ष उपचार करण्यात येतील.
३. उपचाराकरीता वर्षभरासाठी आवश्यक सर्व औषधे उपलब्ध करून देण्यात येतील.
४. संस्थेकडे औषध वाटपाकरीता ०८ कुरिअर सेवा उपलब्ध आहे.
५. संस्थेकडून संपूर्ण कुटूंबासाठी First Aid Kit उपलब्ध करून देण्यात येईल.

नोंदीत बांधकाम कामगारांना कॉमन सर्व्हिस सेंटरला प्रथम भेट देताना होणाऱ्या वेतन नुकसान भरपाई देणेबाबत मंडळ स्तरावरून विचार व्हावा असेही प्रस्तावित केलेले आहे. या संदर्भात मंडळ बैठकीत चर्चेमध्ये सहभागी होताना मा. प्रधान सचिव यांनी सूचित केले की, सद्यस्थितीत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरीता आवश्यक विमा रक्कम राज्य शासन व मंडळाकडून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत संबंधित संस्थेला अदा करण्यात आली आहे. याशिवाय आजच्या बैठकीमध्ये बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी बाबतही प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी मत व्यक्त केले की, बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ॲलोपेथीचे औषधे देत असताना पुनश्च: होमिऑपेथीचे औषधे देणे योग्य राहील का याबाबत विचार विनिमय करणे आवश्यक आहे. याबाबत, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी निर्देश दिले की, सदर प्रस्ताव तपासून सादर करावा.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(४)/२०१८: मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. याशिवाय नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणेबाबतचा प्रस्तावही विचाराधीन आहे. ही बाब विचारात घेता नोंदीत बांधकाम कामगारांना हॉमिओपॅथीचे औषधे देणेबाबतचा प्रस्ताव तपासून पुढील बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार |
| कल्याणकारी मंडळ, मुंबई | कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र. ०५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण योजनेंतर्गत RPL चे प्रशिक्षण देणेबाबत मंडळाने दि.०३.०९.२०१६ रोजीच्या बैठकीत पारित केलेल्या ठरावानुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाच्या दि.२७.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. शासन मान्यतेनुसार RPL प्रक्षिणाकरीता ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज ची नियुक्ती करण्यात आली होती. सदर संस्थामार्फत खालील ०६ बाबींचे प्रशिक्षण नोंदीत बांधकाम कामगारांना देण्यात येत आहे.

१. Bar Bending
२. Masonry
३. Shuttering Carpentry
४. Plumbing
५. Painting
६. Scaffolding

सदर प्रशिक्षणाकरीता केंद्र शासनाकडून मंजूर दरानुसार प्रशिक्षणाची देयके अदा करणे व प्रशिक्षणार्थींना वेतन नुकसान भरपाई (Wage loss) देणेबाबत मंडळाच्या बैठकीत पारित ठरावानुसार सुधारित करारनामा करून RPL योजनेंतर्गत प्रशिक्षित लाभार्थ्यांना वेतन नुकसान भरपाई व प्रशिक्षणाच्या देयकांची अदायगी करण्यात येत आहे.

मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव :- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समितीचे (MSSDS) आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाकरीता सादर केलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मंडळाकडून कार्यरत RPL प्रशिक्षणामध्ये ट्रेडशिवाय अन्य ट्रेडचे प्रशिक्षण देण्यात यावे. याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त करून शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

मंडळाच्या दि.२१.०३.२०१८ रोजी संपन्न बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कौशल्य वृध्दीकरण योजना (RPL) प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला होता व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कौशल्य वृद्धीकरण योजना (RPL) प्रशिक्षणाचा माहे एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाची मंडळाने नोंद घेतली. RPL प्रशिक्षणाची गती वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या पॅनलवरील मंडळाने नियूक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीशिवाय राज्य शासनाचे SCVT (State Concil for Vocational Training) ने मान्यता दिलेल्या संस्थेकडून सुद्धा कामगारांचे ट्रेनिंग व असेसिंग करून घेण्यात यावे. सदर संस्थेकडून RPL प्रशिक्षणाबाबत प्रस्ताव प्राप्त करून शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडूनदि.०६.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२५.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: सहमती दिली होती व उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून माहिती एकत्रित करून त्या अनुषंगाने सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे विस्तृत रूपरेषा तयार करण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडूनत्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.MSSDS/MC/D-२०/२०१८/४३२-४३४ दि.२८.०५.२०१८ अन्वये कामगार विभागास प्रशिक्षणाचा कृती आराखडा सादर करण्यात आलाहोता.

मा. मंत्री महोदय, कामगार यांच्या अध्यक्षतेखाली दि.०२.०८.२०१८ रोजी संपन्न आढावा बैठकीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडून प्रशिक्षणाबाबतच्या कृती आराखडयाचे सादरीकरण करण्यात आले होते. तसेच, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) यांच्या अध्यखतेखाली दि.११.१२.२०१८ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित प्रशिक्षणाबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाची व कृती आराखडयाची प्रत मंडळास पाठविणेबाबत विनंती केली होती.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) यांनी त्यांच्या दि.२६.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम क्षेत्रात कामगार तसेच त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव आणि कृती आराखडा कामगार

विभागास सादर करून त्याची प्रत मंडळास सादर केलेली आहे. सदर प्रस्ताव व त्यासोबतच्या कृती आराखडयातील बाबी खालीलप्रमाणे :-

१. राज्यातील ३४ जिल्हयात २७,००,७९० लक्ष एवढया कुशल बांधकाम कामगारांची आवश्यकता आहे. याबाबतचा जिल्हानिहाय तपशील सादर करण्यात आलेला आहे.
२. MSSDS या संस्थेकडून २९०९ Empanelled व ११८३२ नोंदणीकृत VTPS आहेत. त्यापैकी बांधकाम क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी २६३ VTPS Empanelled असून व १६५२ VTPS नोंदणीकृत आहेत.
३. MSSDS मार्फत २६१८ बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यात आले असून १८८३ बांधकाम कामगार प्रशिक्षण घेत आहेत.
४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित प्रशिक्षण, प्रशिक्षणासाठी उददीष्ट व सदर प्रशिक्षणाकरीता अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण प्रकार | प्रशिक्षण उददीष्ट | प्रस्तावित निधी (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १. | बांधकाम कामगारांना बांधकम क्षेत्रातील कौशल्य विकास प्रशिक्षण | १,५०,००० | १५८.४३ |
| २. | बांधकाम कामगारांच्या कुटूंबियांसाठी विविध क्षेत्रातील कौशल्य विकास प्रशिक्षण | १,००,००० | १७६.९३ |
| | **एकूण** | **२,५०,०००** | **३३५.३६** |

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित प्रशिक्षणाचे सादरीकरण MSSDS या संस्थेकडून करण्यात आले.

MSSDS या संस्थेकडून करण्यात आलेल्या सादरीकरणाबाबत चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित ०६ बाबींवरील प्रशिक्षणाशिवाय राज्य शासनाने सन २०१८ अधिसूचनेद्वारे बांधकामाच्या व्याख्येत २१ नवीन कामांचा समावेश केलेला आहे. सदर कामांवर काम करणाऱ्या नोंदीत बांधकाम कामगारानांही त्या त्या बाबींवरील कामांचे प्रशिक्षण मिळण्यासाठी

सदर बाबीचा समावेश प्रशिक्षणाच्या प्रस्तावात करण्यात यावा. याबाबत सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(५)/२०१९: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेमार्फत देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाच्या बाबींमध्ये बांधकामाच्या व्याख्येत नव्याने समाविष्ट २१ कामासंबंधित बाबींचा समावेश करण्यात यावा तसा सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेकडून मागविण्यात यावा व सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०६ :- नोंदीत बांधकाम कामगारांना वाटप करण्यात येत असलेल्या सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा आढावा**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत ठरावाअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच व सुरक्षा संच पुरविण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने राज्यातील बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दिनांक ०३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. दिनांक २२.११.२०१७ व २३.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर दोन योजना राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

शासन मान्यतेनुसार मंडळस्तरावर दि.२८.११.२०१७ पासून दि. २१.१२.२०१७ पर्यंतच्या कालावधीत ई-निवीदा प्रक्रिया अवलंबविण्यात आली व पात्र निवीदांचे दर स्वीकृतीचा प्रस्ताव दि.२१.०३.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासनाच्या दि.०९.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये संस्था निश्चितीस मान्यता देण्यात आली, व दिं. २४.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दर स्वीकृतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. २२.०५.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत अत्यावश्यक संचाबाबत व सुरक्षा संचाबाबत पुढीलप्रमाणे ठराव घेण्यात आले.

**अत्यावश्यक संच(Essential Kit) ठराव**

**४६(३)/२०१८ ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच (Essential Kit) पूरवठ्याची संस्था व दर निश्चितीबाबत मंडळाने केलेल्या उपरोक्त कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे, अत्यावश्यक संच पुरवठयाबाबत मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. या संस्थेसोबतअत्यावश्यक संचाचे मंजूर दर, निविदा व शासन आदेश/ पत्रातील अटी शर्तीनुसार करारनामा करून पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे,असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

सुरक्षा संच(Safety Kit) ठराव

**४६(२)/२०१८ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच (Safety Kit) पूरवठ्याची संस्था व दर निश्चितीबाबत मंडळाने केलेल्या उपरोक्त कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे,सुरक्षा संच पुरवठयाबाबत मे. इंडो अलाईड प्रोटीन फुड प्रा. लि. या संस्थेसोबत सुरक्षा संचाचे मंजूर दर, निविदा व शासन आदेश/ पत्रातील अटी शर्तीनुसारकरारनामा करून पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात येत आहेव**

**त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे,असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

शासनव मंडळाच्या मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांच्या नियुक्तीस दिलेल्या मान्यतेनुसार दि.३०.०५.२०१८ रोजी सदर दोन्ही पुरवठादार कंपनीसोबत करारनामा करूनमे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. व मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांना दि. १४.०६.२०१८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते.

अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाबाबत क्षेत्रीय कार्यालयांना मंडळ स्तरावरून निर्देश देण्यात आले होते. व वाटपाबाबत पाठपुरावा करण्यात आला याशिवाय मा. मंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव यांचे उपस्थितीत दि. २९.१०.२०१८ रोजी क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या समवेत बैठकीमध्ये संच वाटपाबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या होत्या तसेच बैठकीतील निर्णयानुसार लेखी सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने पुरविलेल्या सुचीनुसार राज्यातील विविध जिल्हयामध्ये अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वितरणाचे काम सुरू आहे. याशिवाय मंडळाच्या वतीने दि. २४.१२.२०१८ रोजी चंद्रपूर येथे व दि.१०.०१.२०१९ रोजी पनवेल येथे अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाचे जाहिर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास उत्कृष्ट प्रतिसाद मंडळास मिळून मोठया प्रमाणावर कामगारांस संचाचे वाटप करण्यात आले.

मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. वमे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांनी दि. १९ जाने २०१९ पर्यंत वाटप केलेल्या अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाचा जिल्हानिहाय तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | नोंदीत बांधकाम कामगारांना वाटप केलेल्या अत्यावश्यक संचाची संख्या | नोंदीत बांधकाम कामगारांना वाटप केलेल्या सुरक्षा संचाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | २०२९ | २०१८ |
| २. | गडचिरोली | १२८६ | १२८६ |
| ३. | कल्याण | १११० | १११० |
| ४. | वाशिम | ११४१ | ११४१ |
| ५. | मुंबई उपनगर (पुर्व) | ११९४ | ११९४ |
| ६. | मुंबई उपनगर (पश्चिम) | १४८३ | १४८३ |
| ७. | ठाणे | ४४५ | ५५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | नाशिक | ९८१६ | ९९४२ |
| ९. | औरंगाबाद | ११२५ | १२९७ |
| १०. | सिंधुदुर्ग | ६३४ | ६३४ |
| ११. | पालघर | १०६२ | १०६२ |
| १२. | अकोला | ३२३२ | ३२३२ |
| १३. | वर्धा | १०७०३ | ११७५५ |
| १४. | सोलापूर | ८९ | ८९ |
| १५. | नागपूर | २७२९० | २७५६३ |
| १६. | बीड | ५१५१ | ५४३४ |
| १७. | चंद्रपूर | ४५१२ | ४५१२ |
| १८. | भिवंडी | १५१ | १५१ |
| १९. | रायगड | १११४ | १११४ |
| २०. | जालना | २१९९ | २१९९ |
| २१. | पुणे | १७९६ | १७९६ |
| | एकुण | ७७,५७८ | ७९,५७२ |

मंडळाकडून नियुक्त दोन्ही संस्थानी दि.२० फेब्रूवारी २०१९ पर्यंत **१,५०,०००** संचे वाटप करण्यात येईल असे त्यांच्या दि. १९.०१.२०१९ च्या पत्रात नमूद केले आहे. त्याशिवाय संच वाटपाकरीता खालील अडीअडचणी निर्दशनास आणण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्न)

१. मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. वमे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांना स्थानिक स्तरावर यादी प्राप्त न होणे, त्यामुळे सतत कॅम्पचे आयोजन करणे, आयोजन केले तरी प्रत्यक्ष कामकाजावर देखरेख ठेवण्याकरीता कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने कॅम्पचे आयोजन करता येत नाही. तसेच मागणी अर्ज देखील उपलब्ध होत नाहीत.

२. मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांना प्राप्त झालेल्या पुरवठा आदेशानुसार अत्यावश्यक/सुरक्षा संचचे वाटप करीत असतांना सदर वाटपा दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सदरचे संच वाटप होणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत सदर संस्थेला परस्पर कॅम्पचे आयोजन करता येणे शक्य होत नाही व बऱ्याच जिल्हयामध्ये कामगार अधिकारी फारच कमी आहेत.

३. कॅम्पच्या आयोजनानंतर एका कामगारास संच वाटप केल्यानंतर प्रपत्र-४ च्या प्रतिवर सरकारी कामगार अधिकारी वर्गास सहया करणे आवश्यक असल्याचे पुरवठा

आदेशात म्हटले आहे. त्यामुळे मर्यादित वेळेच्या अभावामुळे शक्य होत नाही. त्यातच दररोज कॅम्पचे आयोजन केले असेल तर दररोज संच वाटपाच्या संख्येच्या ५ पटीने अधिकाऱ्यांना स्वाक्षरी करता येणे शक्य होत नसल्याने पुरवठा केल्याचे असंख्य अर्ज हे सहयाविना कार्यालयात पडून राहतात.

४. मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांनी ७७, ५७८ व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांनी ७९,५७२ संचाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. पुरवठा केलेल्या संच वाटपाची देयके ४ प्रतित विभागीय कार्यालयाकडे सादर करावी लागतात इतक्या मोठया प्रमाणावर संच वाटप झाले असतानाही अधिकाऱ्यांच्या सहया नसल्याने, पुरवठा केलेल्या देयकाची पडताळणी करण्याकरीता अधिकारी वर्ग नसल्यानेमे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांच्याकडे अदांजे ३० ते ३५ कोटी रूपये इतक्या रककमेची बिले तपासणी विना पडून राहीली आहेत. देयकांच्या रक्कमा अप्राप्त असल्याने पुढील किट वाटपावर देखील मर्यादा येत आहेत.

वरीलप्रमाणे अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाची सद्यस्थिती अहवाल मंडळास अवगत करण्यात आली.

अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाबाबत केलेल्या कार्यवाहीची मंडळाने नोंद घेतली. अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाची अद्यावत स्थिती करीता मंडळाच्या www.mahabocw.in संकेतस्थळावर तयार करण्यात आलेल्या प्रणालीद्वारे संच वाटपाबाबतची माहिती मंडळासमोर सादर करण्यात आली. मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या संच वाटपाच्या कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

**ठराव क्र. ४९(६)/२०१९: मंडळामार्फत दि.१९.०१.२०१९ पर्यंत अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपाबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे, ज्या जिल्हयामध्ये सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे अद्यापही वाटप झालेले नाही त्या जिल्हयात संच वाटपाबाबत कार्यवाही करण्यात यावी. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाकरीता नियुक्त संस्थेस व क्षेत्रिय कार्यालयांना याबाबत सूचना देण्यात याव्यात असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ०७ :- मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना लेबर शेडची सुविधा उभारणेबाबत**

केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत दि.११ जुलै २०१७ रोजी लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच इ. सुविधा बांधकाम कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदर पत्राची प्रत दि.२२.०९.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली होती.

बांधकाम कामगार कामानिमित्त सतत स्थलांतरीत होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाल्यांनतर प्रत्यक्ष काम मिळेपर्यंत सदर बांधकाम कामगारांना राहणे, शौचालय,पाळणाघर इत्यादी अभावी मुलभूत सोयी सुविधेकरीता त्रास सहन करावा लागतो. बांधकाम कामगारांना लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेंच अशा सोयी सुविधा मंडळामार्फत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने त्यांच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षे संबधीत योजनांचा लाभ दिल्यानंतर उपलब्ध निधीमधून उपरोक्त सोयी सुविधावर खर्च करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सर्व निर्देशास अनुसरून मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर प्रस्तावावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव: अन्य राज्यामधून अथवा राज्यातील अन्य भागामधून बांधकामाशी संबंधित कामाकरीता आलेल्या जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीता ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. सदर योजना प्रथम टप्प्यात मुंबई,पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या सहा विभागीय स्तरावर प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) उभारताना त्यामध्ये निवास, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह या मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) मध्ये कामगारांना प्रवेश देण्यापासून ते कामगारांना काम मिळेपर्यंत अथवा १० दिवस यापैकी जे कमी असेल त्या कालावधीपर्यंत कामगारांना ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच कोणताही बांधकाम कामगार निर्धारित मुदतीपेक्षा जास्त् कालावधीपर्यंत ट्रांझिट कॅम्प (Transit Camp) मध्ये राहणार नाही याची दक्षता नियुक्त संस्थेची राहील. ट्रांझिट कॅम्प (Transit Camp)च्या कराराची मुदत संपल्यानंतर नियुक्त संस्थेने शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी मालकीची जागा संबंधित मालकांना परत करावी, याबाबतची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील. यथा प्रस्तावित अटी शर्तीसह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात**

**यावा, शासन स्तरावरून योजना मंजूरीनंतर योजना राबविण्यासाठी सदर क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक ई-निविदा पद्धतीने करण्यात यावी. ई- निविदा मागविण्यासाठी आवश्यक RFP Document मंडळाचे e-Gov Consultant यांच्याकडून तयार करून घेण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावामध्ये अंशत: बदल करून ट्रांझिट कॅम्प ऐवजी नाका कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबतप्राप्त निर्देशानुसार दि.२२.०५.२०१८ रोजीच्या मंडळ बैठकीत सादर आयत्या वेळचा विषय क्र. १६.०३ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव क्र. ४६(१६.३)/२०१८:मंडळाकडे नोंदित असणाऱ्या बांधकाम कामगारांपैकी महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात नाक्याच्या ठिकाणी जमा होतात अशा नाक्यावरील बांधकाम कामगारांसाठी महानगरपालिका/ नगरपालिकेच्या जागेवर पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालयाचा समावेश असलेले शेड उपलब्ध करून देण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, संबंधित जिल्हयातील नाक्याची माहिती जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त करावी तसेच संबंधित महानगरपालिकांना नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्यासाठी जागा व त्यासाठी आवश्यक तरतूदीचा प्रस्ताव मागविण्यात यावा. महानगरपालिकेकडून प्राप्त प्रस्तावानुसार बांधकाम कामगारांसाठी तात्पुरते शेड उभारण्यासाठी निधी मागणीचा प्रस्ताव महानगरपालिका/ नगरपालिकांकडून प्राप्त करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या पारित उपरोक्त ठरावानुसार दि.१८.०७.२०१८ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

नोंदीत बांधकाम कामगारांकरीता नाक्यांच्या ठिकाणी शेड उभारण्यासाठी साधारणत: ५०/१००/२०० कामगारांकरीता पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय, बसण्याची व्यवस्था इ. सह शेडचे डिझाईन तयार करणे, अंदाजित खर्च व अनुषंगिक बाबींवरील कार्यवाहीकरीता मे. देवधर असोसिएटस या वास्तूविशारदकांना नियुक्त करण्यात आली आहे मे. देवधर असोसिएटस यांनी तयार केलेल्या शेडचे डिझाईन्स मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे. मंडळ सचिवांनी मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रतिनिधींना सादरीकरणाची सूचना दिली त्यानुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रातिनिधीनी शेडच्या वेगवेगळया डिझाईन्सचे सादरीकरण केले व वेगवेळया डिझाईन्सकरीता आवश्यक जागा, अंदाजित खर्च इत्यादी बाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी निर्देश दिले की, सदर सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना पाठविण्यात यावी व मंडळ सदस्यांकडून प्राप्त सूचनेनुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रतिनिधीकडून आवश्यक तो बदल करून सदर योजनेसाठी सुधारित शेडच्या डिझाईन्सचे सादरीकरण तयार करून मंडळाच्या आगामी बैठकीत

सादर करण्यात यावी. यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.४७(५)/२०१८: नोंदित बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत, मंडळाच्या बैठकीत मे. देवधर असोसिएटस सादर केलेले सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना पाठवून त्यावर मंडळ सदस्यांच्या अभिप्रायानुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रातिनिधीकडून आवश्यक तो बदल करून सदर योजनेसाठी सुधारित शेडच्या डिझाईन्सचे सादरीकरण तयार करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार शेडच्या डिझाईनचे सादरीकरण दि.१९.०७.२०१८ रोजी सर्व मंडळ सदस्यांना पाठविण्यात आले. यासंदर्भात मंडळ सदस्य श्री. कुटासकर यांनी दि.२३.०७.२०१८ रोजी व श्री. देवरूखकर यांनी दि. २५.०७.२०१८ रोजी खालीलप्रमाणे अभिप्राय मंडळास सादर केले.

**श्री. कुटासकर यांचे अभिप्राय :-**

यातील शिपिंग कंटेनर चे शेड योग्य वाटते. मात्र त्याचे डिझाईन तयार करताना ते तीन मजली असावे ग्राउंड फ्लोअर वर कामगारांसाठी बसण्याची जागा दुसऱ्या मजल्यावर टॉयलेट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व तिसऱ्या फ्लोअरवर फॅसिलिटेशन सेंटर या प्रमाणे डिझाईन तयार करून मंडळाच्या बैठकीत ठेवावे. असे केल्यास कामगारांना बसण्यासाठी ज्यास्त जागा उपलब्ध राहील टॉयलेट व पिण्याच्या पाण्याचा वापर गरजे नुसार होणार आहे. त्यामुळे या बाबत विचार करून एकमताने निर्णय घ्यावा.

**श्री. देवरूखकर यांचे अभिप्राय :-**

बांधकाम कामगारांसाठी नाक्यावर शेड उभारण्यासाठी प्लॅन दाखविण्यात आले. त्यामधील कंटेनरमधील शेडचा प्लॅन मला योग्य वाटतो. परंतु, बांधकाम कामगारांचे नाके हे दाटीवाटीच्या ठिकाणी आहे. (विशेषत: मुंबईमध्ये) त्यामुळे कामगारांच्या शेड उभारण्यासाठी पालिका, महानगरपालिका यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे जागेच्या उपलब्धतेची खात्री झाल्यानंतरच RFP बनविण्यात यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मंडळ सदस्यांच्या सूचना व दरम्यानच्या कालावधीत झालेल्या आढावा बैठकीत मे. देवधर असोसिएटस यांनी सादर केलेल्या डिझाईन्समध्ये आवश्यक तो बदल करून नोंदीत बांधकाम कामगारांकरीता उभारवयाच्या नांका शेडचे डिझाईन्स तयार करण्यात आले असून त्याबाबतचे सादरीकरण मंडळाच्या बैठकीत सादर करणे प्रस्तावित आहे. मंडळाच्या मान्यतेअंती राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांना बांधकाम कामगारांच्या नाका शेड करीता जागा उपलब्धतेबाबत कळविण्यात येईल व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध करून दिलेल्या जागेच्या आधारे ५० बांधकाम कामगारांकरीता

नाका शेड व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. मंडळाने मंजूर केलेल्या डिझाईन्स व सोबतच्या सोयी सुविधानुसार अंदाजपत्रक तयार करून त्याआधारे मंडळाचे ई- गव्हर्नन्स सल्लागार मे. केपीएमजी यांचेकडून RFP डॉक्युमेंटस तयार करण्यात येईल. सदर RFP डॉक्युमेंटला शासन मान्यता प्राप्त करून ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चित करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. याबाबतचे सादरीकरण करण्यात आले. सदर सादरीकरणावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(७)/२०१९:- मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांकरीता महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषदा व नगरपंचायत क्षेत्रात त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर बांधकाम कामगारांकरीता नाका शेड उभारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेअंती ई-निविदा पध्दतीने नाका शेड उभारण्याकरीता संस्था व दर निश्चित करण्यात यावेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना नाका शेड उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देणेकरीता मंडळ स्तरावरून विनंती करण्यात यावी तसेच महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषदा व नगरपंचायत यांना नाका शेड करीता जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावरून सूचना देण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०८:- एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबाबतचे निविदा प्रक्रिया, संस्था निश्चिती, दर स्विकृती करीता मंडळाची मान्यता मिळणेबाबत**

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी मंडळाचे कामकाज व गरजा हाताळण्यासाठी मंडळात स्वत:चे आस्थापनेवर पूर्ण वेळ कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव आणि हिशोब व लेख्यांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिशय अपुरी प्रणाली ही मंडळाच्या प्रशासकीय अक्षमतेची कारणे असल्याचे आपल्या क्षेत्रिय लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेले आहे.

सबब, मंडळाने यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी मंडळाच्या एकात्मिक कामकाजाचा अंतर्भाव असणारे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याचे सुनिश्चित केलेले आहे.

मंडळाच्या दि.३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आलेला आहे. तसेच मंडळाच्या दि.०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये व दिनांक ०२.११.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र.०५ अन्वये मे. अर्न्स्ट अँड यंग एल पी.पी. या कंपनीच्या ०१ सिनिअर कन्सल्टंट व ०१ कन्सल्टंटची सदर कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्यासाठी नियुक्ती करण्यात आलेली होती, सदर संस्थेने तयार केलेल्या RFP डॉक्युमेंटसनुसार HPC च्या मान्यतेअंती माहिती व तंत्रज्ञान विभागातील राबविली जाणारी निविदा प्रक्रिया कामगार विभागामार्फत रद्य करण्यात आलेली आहे व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मे. केपीएमजी या संस्थेची मंडळाने सल्लगार म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांना RFP डॉक्युमेंटस तयार करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

मे. केपीएमजी यांनी तयार केलेले प्रारूप RFP Document बाबत मा.प्रधान सचिव कामगार विभाग, मा. कामगार आयुक्तव मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांची संयुक्त बैठक मा. प्रधान सचिव यांचे दालनात दि.०२.०६.२०१७ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्रारूप RFP Document मध्ये काही बदल करावयाचे ठरले. सदर बदलानुसार सुधारित RFP Document तयार करून दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव:बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करावे. सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्यात यावी. कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या RFP Document मध्ये उपरोक्त बाबींचा समावेश करुन शासन मान्यतेस लवकरात लवकर सादर करण्यात यावा. तसेच, सुधारित आकृतीबंध तयार करून शासन मान्यतेस पाठविण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने शासनास कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठीच्या दोन वेगवेगळ्या RFP Document शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेल्या होत्या. कामगार विभागामार्फत दि. १८.०१.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली संप्पन उच्चाधिकार समितीच्या (HPC) बैठकीत विषय सादर करण्यात आला असून त्यास HPC ची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने दि.०७.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंडळाच्या संपूर्ण कामकाजाचा अंतर्भाव असणारी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी, संचालन व देखभालीकरीता व्यवस्थापन सेवा प्रदात्याच्या (Management Service Provider) निवडी संदर्भात तयार करण्यात आलेल्या RFP ला मान्यता देण्यात आलेली आहे.

शासनस्तरावरून मंजूर RFP नुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदेप्रक्रिये दरम्यान निविदा पूर्व बैठकीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या निविदा अटी शर्ती संदर्भाच्या मुद्याबाबत मंडळाचे अभिप्राय तयार करण्यात आले त्यानुसार प्रसिध्द निविदा अटी शर्ती मध्ये करावयाच्या बदलास मंडळाच्या दि.२१.०३.२०१८ रोजी बैठकीत सादर प्रस्तावावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव: मंडळाच्या संपूर्ण कामकाजाबाबत एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करणेबाबत HPC च्या मान्यतेस अनुसरून मंडळाने केलेल्या कार्यवाहीस व निविदेस प्रतिसाद वाढविण्याकरीता इच्छुक निविदाकारांच्या मागणीस अनुसरुन निविदेच्या अटी शर्तीमध्ये करावयाच्या प्रस्तावित बदलास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत**

**आहे, त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून दर स्वीकृत व संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

निविदा पूर्व बैठकीत उपस्थित मुद्यास अनुसरून मंडळाचे अभिप्रायwww.mahatender.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. सदर निविदेस दि.१३.०३.२०१८ ते ०५.०५.२०१८ पर्यंत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. तसेच, सदर निविदेला ०३ वेळा शुध्दीपत्रकहीwww.mahatender.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. सदर निविदा सूचनेच्या प्रतिसादामध्ये ०३ इच्छुक निविदाकारांनी दि.१९.०५.२०१८ रोजी निविदा सादर केलेल्या आहेत. सदर निविदांची तांत्रिक छाननीचा मे. केपीएमजी e- Gov सल्लागार यांचेमार्फत सादर केलेला तपशील निविदा खरेदी समितीच्या दि.०६.०९.२०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला.सदर बैठकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यानुसार सदर बैठकीस श्री. कोमलकांत मस्की, SEMT सल्लागार, DIT हजर होते. मंडळाकडून प्रसिध्द निविदा सूचनेच्या प्रतिसादात खालील ०३ संस्थांनी निविदा सादर केल्या होत्या

१. मे. ऑरिओन प्रो सोलूशन लि.
२. मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा. लि.
३. मे. डायनाकॉन्स सिस्टीम अॅन्ड सोलूशन लि.

सदर निविदा छाननी करीता मे. के.पी.एम.जी.या मंडळाच्या ई-सल्लागार संस्थेकडे वर्ग करण्यात आल्या होत्या. दि. ०६.०९.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मे.के.पी.एम.जी.यांनी निविदांची छाननी केलेला तपशिलावर बाब निहाय चर्चा करण्यात आली. सविस्तर चर्चेअंती व निविदे सोबतच्या कागदपत्रांच्या पडताळणी अंती सादर ३ निविदांपैकी खालील प्रमाणे निविदाकार पात्र/अपात्र असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | अपात्रतेचे कारण |
|---|---|---|---|
| १ | मे. ऑरिओन प्रो सोलूशन लि. | पात्र | -- |
| २ | मे. आयटी आयलिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. | पात्र | -- |
| ३ | मे. डायनाकॉन्स सिस्टीम अॅन्ड सोलूशन | अपात्र | १. नेटवर्थ कमी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लि. | | | २. CMMI प्रमाणपत्र सादर केलेले नाही.<br>३. मोबाईल ॲप बनवण्याचा अनुभव सादर केला नाही. |

निविदांच्या छाननीअंती पात्र ०२ निविदाकारांना सादरीकरणासाठी खरेदी समितीने दिलेले गुणांकन खालील प्रमाणे:-

| अ. क्र. | तांत्रिक सादरीकरण | कमाल चिन्ह | मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. | मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. |
|---|---|---|---|---|
| ४.१ | कामाची व्याप्ती समजणे | १० | ६ | ८ |
| ४.२ | दृष्टीकोन, पद्धती, व प्रकल्प रोल-आउट योजना | १० | ६ | ८ |
| ४.३ | ऑपरेशन आणि देखभाल, गुणवत्ता नियंत्रण आणि व्यवस्थापन योजना | १० | ७ | ९ |
| एकूण गुण | | ३० | १९ | २५ |

निविदा छाननीअंती खरेदी समिती समोर पात्र निविदाकारांनी केलेले सादरीकरण व तांत्रिक गुणांकनासह त्यांचे एकूण गुणांकन खालील प्रमाणे:-

| तांत्रिक मूल्यांकन | कमाल गुण | मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. | मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. |
|---|---|---|---|
| तांत्रिक मूल्यांकन (१.० + २.० + ३.०) | ७० | ५२ | ६५ |
| तांत्रिक सादरीकरण (४.०) | ३० | १९ | २५ |
| एकूण संख्या | १०० | ७१ | ९० |
| ७०% च्या तांत्रिक गुण | | ४९.७ | ६३ |

दि. ०६.०९.२०१८ रोजी निविदा छाननी अंती खरेदी समितीने खालील प्रमाणे निर्णय घेतले होते

१) मंडळाकडे सादर ३ निविदांपैकी मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. व मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. हे २ निविदाकार तांत्रिक छाननीनुसार पात्र आहेत. तर मे. डायनाकॉन्स सिस्टीम अॅन्ड सोलूशन लि. ही एक संस्था तांत्रिक छाननी नुसार अपात्र आहे.

२) मे. ऑरिओन प्रो सोलूशन लि. व मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या २ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या पुरवठ्याच्या अनुभवाबाबत पुरवठा आदेश देणाऱ्या संस्थांकडून यशस्वी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावे.

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दिनांक ०१.१२.२०१६ च्या भाग क्र. ४.४.३.१ उपकलम (ब) नुसार "दोन निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० टक्के ते (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमतीत आल्यास फेर निविदा काढावी." असे नमुद केलेले आहे. ही बाब विचारात घेवून सदर अटीच्या अधीन राहून पात्र २ संस्थांनी सादर केलेले दरपत्रक उघडण्यात यावे.

४) मंडळामार्फत सादर केलेल्या निविदा प्रारुप (RFP) ला शासनाच्या दि. ०७/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, सदर पत्रातील नमुद अटीनुसार शासन निर्णय २४/०८/२०१७ मधील अटीची पूर्तता करता येणार नाही ही बाब शासनास लेखी स्वरुपात कळवून सदर अट शिथिल करण्याबाबत विनंती करण्यात यावी.

उपरोक्त निर्णय क्रमांक २ प्रमाणे मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि.व मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या २ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या पुरवठ्याच्या अनुभवाबाबत पुरवठा आदेश देणाऱ्या संस्थांकडून यशस्वी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत दि. १२.०९.२०१८ रोजी पत्र व ई-मेल व्दारे कळविण्यात आले.

त्यानुसार नागपूर मेट्रो रेल कॉरपोरेशन यांनी मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. व भारत संचार निगम लि. यांनी मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. यांच्याकडून यशस्वी पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त निर्णय क्रमांक २ प्रमाणे मंडळामार्फत दि. ०४.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन निर्णय २४/०८/२०१७ मधील अटीची पूर्तता करता येणार नाही असे कळवून सदर अट

शिथिल करण्याबाबत विनंती करण्यात आली त्यानुसार शासनाच्या दि. १९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर अट शिथिल करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णय क्रमांक ३ प्रमाणे मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. व मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या २ पात्र निविदाकारांनी सादर केलेले दरपत्रक निविदाकारांच्या प्रतिनिधिंच्या समक्ष दि. २०.१०.२०१८ रोजी ई-निविदा पोर्टलवर उघडण्यात आले. निविदाकारांनी सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर (रु.) |
|---|---|
| मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. | १७५,३३,१६,४८६/- |
| मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा .लि. | ८९,९२,६५,८५४/- |

निविदेच्या कलम क्र. ४.२० अन्वये, निविदाकाराने सादर केलेल्या आर्थिक लिफाफ्याच्या मुल्यांकना प्रमाणे मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या निविदाकाराचे गुण जास्त आहेत.

त्यांचा गुणात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| निविदाकाराचे नाव | ७०% चे तांत्रिक गुण | ३०% चे आर्थिक गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. | ४९.७० | १५.३९ | ६५.०९ |
| मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. | ६३.०० | ३०.०० | ९३.०० |

पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या दरपत्रकांचा तपशील व दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संदर्भ | निव्वळ रक्कम (रु.कोटी मध्ये) | कर (रु.कोटी मध्ये) | एकूण रक्कम (रु.कोटी मध्ये) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | उच्चस्तरीय समितीची मंजूरी दिनांक १८.०१.२०१८ | ६८.३१ | १२.३१ | ८०.६२ | |
| २. | निविदा पूर्व बैठकित मंजूर बदलानुसार शुद्धीपत्रक दिनांक ०४.०४.२०१८ | ७१.५४ | १२.९४ | ८४.४८ | **१. वाढ**<br>अ. स्मार्ट कार्ड रीडर वाढ रु. ३.४५ लक्ष<br>आ. स्मार्ट कार्ड खर्च रु.६.३७ कोटी<br>**२. घट**<br>अ. डेटा स्थलांतरण, किंमतीमधील रु.२.१२कोटी (१५,००,००० पृष्ठे)<br>आ. मनुष्यबळ विमा खर्चरू. ४७.७२ लक्ष<br>**३. एकूण फरक :-** रू. ३.८१ कोटी वाढ |
| ३. | महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार, दिनांक ०१.१२.२०१६ लागू खर्चनुसार (-२०% | च्या श्रेणीत स्वीकाराहार्य ५७.२३ ते ७८.६९ | -- | च्या श्रेणीत स्वीकाराहार्य ६७.५८ ते ९२.९३ | महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार, दिनांक ०१.१२.२०१६ मधील भाग क्र. ४.४.३.१ उपकलम (ब) अनुसार स्वीकाराहार्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रक्कमेच्या + १०% पर्यंत) | | | | |
| ४. | मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. | ७६.१३ | १३.८० | ८९.९३ | • उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.४.३.१ नुसार दर स्विकृती प्रस्तावित आहे. |
| ५. | मे. ऑरिओनप्रो सोलूशन लि. | १४८.३७ | २६.९६ | १७५.३३ | • उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.४.३.१ नुसार द्वितीय क्रमांकाची निविदा आहे. |

उच्चाधिकार समितीच्या (HPC) दि.१८.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार ई-निविदा मागविण्यात आल्या त्याबाबतच्या उपरोक्त तपशीलासह दर स्विकृती व संस्था निश्चितीचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या मान्यतेकरीता शासनास सादर करण्यात आला. सदर प्रस्तावात समाविष्ट ३४ जिल्हा कामगार सुविधा केंद्र ऐवजी पिंपरी-चिंचवड करीता स्वतंत्र जिल्हा कामगार सुविधा केंद्रासह ३५ जिल्हा कामगार सुविधा केंद्र व ०६ विभागीय कार्यालये (जिल्हा कामगार सुविधा केंद्रासह) प्रस्तावित करण्यास मान्यता प्रदान करावी अशी विनंती शासनास करण्यात आली होती.

सदर प्रस्तावाला अनुसरून कामगार विभागामार्फत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील HPC च्या मान्यतेस सादर प्रस्तावाबाबत दि.१८.१२.२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये न्यूनत्तम निविदाकार आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि . या संस्थेसोबत मा. प्रधान सचिव, कामगार विभाग व सचिव माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी वाटाघाटी करून दर निश्चित करावे असा निर्णय घेण्यात आला त्यानुसार

मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्या दालनात व मा. सचिव माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या उपस्थितीत दि.१५.०१.२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न बैठकीत वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटी अंती आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. यांनी निविदेमध्ये सादर केलेले रू.८९.९३ कोटी ऐवजी रू. ८८.३० एवढया रक्कमेत काम करण्यास लेखी संमती दर्शविली व त्यासोबत आवश्यक प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. त्यास अनुसरून शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेनुसार मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेसोबत करारनामा करून कार्यरंभ आदेश देणे प्रस्तावित आहे.

मंडळाचे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्याबाबतचे निविदा प्रक्रिया, संस्था निश्चिती, दर स्विकृतीबाबत मंडळ व शासन स्तरावरून वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीस, मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. संस्था यांच्या नियुक्तीस व वाटाघाटी अंती स्विकृत दराबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता.

मंडळाचे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबाबत मंडळ स्तरावरून केलेल्या कार्यवाहीची मंडळाने नोंद घेतली आहे. तसेच, सदर प्रणालीचे निविदा मागविणे, निविदा उघडणे, HPC ची मान्यता इत्यादीबाबत मंडळाने मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. यांनी निविदेमध्ये सादर केलेले रू.८९.९३ कोटी ऐवजी रू. ८८.३० एवढया रक्कमेत काम करण्यास लेखी संमती दर्शविली व त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. या संस्थेसोबत करारनामा करून कार्यारंभ आदेश देण्यात यावे.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(८)/२०१८: मंडळाचे एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबाबत मंडळ स्तरावरून राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि. यांनी वाटाघाटीअंती सादर केलेले दर रू. ८८.३० कोटी एवढया रक्कमेच्या**

खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर दरास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर मे. आयटीआय लिमिटेड विथ ऑरसीअस इन्फोटेक प्रा.लि.या संस्थेसोबत रीतसर करारनामा करून कार्यारंभ आदेश देण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| --- | --- |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०९ :- महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मिळणेबाबत.**

याबाबत सचिवांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने दि. १८/०७/२०१८ रोजी नागपूर येथे संपन्न झालेल्या मंडळाच्या बैठकीत खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव:-"मंडळात स्वतंत्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत, मंडळाचे कामकाज यथास्थित कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडेच असावे व कामगार कल्याण मंडळाचे अधिकारी/ कर्मचारी तसेच कामगार कल्याण मंडळाच्या प्रादेशिक कार्यालये, गट कार्यालये व कामगार कल्याण केंद्र या क्षेत्रिय कार्यालयांची मदत, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील कामगारांची नोंदणी, लाभ वाटप व इतर अनुषंगिक कामाकरीता घेण्यात यावी. याबाबत तसेच कामगार कल्याण मंडळाच्या केंद्र प्रमुखांनाही "नोंदणी अधिकारी" घोषित करणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."**

त्यानुसार मंडळाने कामगार कल्याण मंडळास पाठविलेल्या दिनांक २९/०८/२०१८ च्या पत्रामध्ये उपरोक्त ठरावानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार प्रभारी कल्याण आयुक्त यांनी त्यांच्या दि. १२/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय मंडळास सादर केलेले आहेत.

१. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास सहकार्य करण्यास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची हरकत नाही.

२. तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाटप सुलभतेने व गतिमानतेने होण्यासाठी कामगार कल्याण मंडळाच्या तालुका स्तरावरील निवडक प्रस्तावित १०० केंद्रांची यादी मंडळास सादर केली.

३. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ (उदा. पाळणाघर, व्यायामशाळा, जलतरण तलाव, सांस्कृतिक सभागृहे, संगणक प्रशिक्षण वर्ग महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावरील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना देणे शक्य आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ अनुसार त्यात कोणतीही अडचण नाही.

प्र. कल्याण आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्या उपरोक्त पत्रात केलेल्या विनंतीनुसार दिनांक ०४/१०/२०१८ रोजी मंडळ कार्यालयात व दि. ११/१०/२०१८ व दि. २०/१०/२०१८ रोजी कामगार कल्याण मंडळ कार्यालयात विविध मुद्यांबाबत संयुक्त बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार मंडळ स्तरावरून शासनास रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होत. सदर प्रस्तावास अनुसरून शासन स्तरावरून काही मुद्यांवर सविस्तर माहिती सादर करण्याबाबत रोजीच्या निर्देश देण्यात आले आहेत. शासन निर्देशात अनुसरून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व कामगार कल्याण मंडळाच्या अधिकाऱ्यांची पुनश्च: दि.०४.०१.२०१९ रोजी मंडळ कार्यालयात संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत खालील मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.

१. कामगार कल्याण मंडळाकडील योजना/ उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी प्रति नोंदीत कामगार रू.२५/- या दराने नोंदणी फी कामगार कल्याण मंडळाकडे जमा करावी.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ नोंदीत बांधकाम कामगारांसाठीची "आस्थापना" समजून प्रति नोंदीत कामगार प्रति सहा महिन्याकरीता कामगारांची वर्गणी रू.१२/- व आस्थापना वर्गणी रू.३६/- असे एकूण प्रति नोंदीत कामगार रू.४८/- याप्रमाणे वार्षिक वर्गणी रू. ९६/- कामगार कल्याण मंडळाकडे जमा करावी.

३. कामगार कल्याण मंडळाकडे कार्यान्वित योजना/ उपक्रमाकरीता निर्धारित फी प्रत्येक योजना/ उपक्रमाकरीता स्वतंत्रपणे न आकारता सर्व योजना/उपक्रमाकरीता एक ठोक रक्कम निश्चित करून नोंदीत बांधकाम कामगारांना व कुटूंबियांना कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा/उपक्रमाचा लाभ देण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हे आस्थापना समजता येईल काय? अशी विचारणा सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली. त्याबाबत विधी अधिकारी कामगार कल्याण मंडळ यांनी असे निदर्शनास आणले की, "महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७, मधील कलम २(४)मध्ये "आस्थापना" याची व्याख्या नमूद केली आहे. तसेच सदरहू अधिनियमातील कलम ३ व ४ मध्ये ज्या आस्थापना अथवा व्यक्तींना अधिनियम लागू होणार नाही याबाबतचा तपशिल नमूद करण्यात आला आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ही दोन्ही मंडळे स्वायत्त असून त्यांना सद्यस्थितीत उपरोक्त अधिनियम लागू होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन कामगार कल्याण मंडळाने याबाबतचा उचित प्रस्ताव सादर करावा," असे बैठकीत ठरले.

सदर बैठकीत चर्चेस अनुसरून प्रभारी कल्याण आयुक्त यांनी दि.२३.०१.२०१९ रोजी सविस्तर प्रस्ताव मंडळास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील तपशील खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना अनुज्ञेय ठरविण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम २(२) मधील "कर्मचारी" या व्याखेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून उक्त अधिनियमातील कलम २(३) मधील "मालक" या व्याखेत येणाऱ्या मालक आणि कलम २(४) मधील "आस्थापना" या व्याखेत येणाऱ्या आस्थापनांकडून कामगार कल्याण मंडळास कल्याण निधी प्राप्त होतो. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत असलेल्या बांधकाम

कामगारांना देखील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ देता येईल.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे कल्याण निधी आणि कल्याणकारी कार्यक्रम यासाठी "स्थानिक प्राधिकरण(Local Authority)"आहे. त्यामुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगांरासाठी बांधकाम व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २२(२) मधील तरतूदीनुसार आर्थिक अर्थसहाय्य (Subsidy) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात भरणा करता येईल आणि त्यामुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगांराना व त्याच्या कुटुंबीयांना महाराष्ट्रकामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेता येईल, असा प्रस्ताव सादर केला आहे.

तसेच मा.मंत्री महोदय (कामगार) महोदयांनी दि.०६.०७.२०१८ रोजी नागपूर अधिवेशन काळात नागपूर येथे आणि दि.३१.०७.२०१८ व दि.२१.०१.२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे कामगार विभागाच्या कामकाजाच्या आढावा बैठकीत महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ महाराष्ट्र राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळे, माथाडी मंडळे आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील कर्मचारी, नोदंणीकृत सुरक्षा रक्षक, माथाडी कामगार व बांधकाम कामगार यांना मिळण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.ही वस्तुस्थिती व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत होणारा बांधकाम कामगार याची नाजूक आर्थिक परिस्थिती व महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ व बांधकाम व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम १९९६ या अधिनियमांचे हेतू विचारात घेऊन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांचेकुटुंबीय सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या २६ योजनांचा लाभ रु.७००/- प्रति वर्षी प्रति जिवित नोंदणीकृत बांधकाम कामगार, महाराष्ट्रात कुठेही लाभ घेऊ शकेल,

असे प्रस्तावित केले आहे. मात्र, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास नोंदणीकृत बांधकाम कामगारासाठी, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम ६ बब अनुसार कामगार-मालक अंशदान कल्याण मंडळात भरणा करता येईल काय? या संदर्भातील कायदेशीर बाबी तपासून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व शासन स्तरावरून अंतिम निर्णय घ्यावा, असे प्रभारी कल्याण आयुक्तांनी सुचविलेले आहे. त्यास अनुसरून मंडळाच्या मान्यतेस खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

१. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून त्या त्या ठिकाणी राबविण्यात येत असलेल्या (सोबतचे प्रपत्र) विविध योजनांचा लाभ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोदित जिवित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता, महाराष्ट्रात कल्याण मंडळामार्फत प्रस्तावित माफक फी प्राति कुटूंब प्रति वर्षे रू.७००/- बाबत विचारविनियम करून फी चे दर ठरविणे प्रस्तावित आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांचे अंशदान महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम ६ बबनुसार कामगार कल्याण मंडळास अदा करणेबाबत शासन स्तरावरून निर्णय घेणेबाबत प्रस्तावित केले आहे. मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. **ठराव क्र.४९ (०९)/२०१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित जिवित बांधकाम कामगारास व त्याच्या कुटुंबीयास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडील सद्यस्थितीत सुरू असलेल्या २६ विविध योजना व उपक्रम यांचा लाभ महाराष्ट्रातील कोणत्याही कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रावर उपलब्ध करून देण्यात यावा. यासाठी त्या कामगाराची महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडील नोंदणी फी घेण्यात येवू नये. कामगार कल्याण मंडळाकडील विविध योजना व**

उपक्रमाचा लाभ मिळण्यासाठी प्रतिलाभार्थी प्रति वर्ष सवलतीच्या दराची ठोक रक्कम शासनस्तरावरून निश्चित करण्यात यावी. त्यानुसार, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी योजना/उपक्रमांचा प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार प्रति लाभार्थी ठोक रक्कम कामगार कल्याण मंडळास अदा करण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१० :- मंडळाच्या वतीने नोंदीत बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजना, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच इत्यादी लाभ वाटपाकरीता आयोजित कार्यक्रम व्यवस्थापनाकरीता निवड केलेली संस्था व दरास मान्यता देणेबाबत.**

मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव कामगार यांच्या उपस्थितीत झालेल्या दि.१५.१२.२०१८ रोजीच्या कामगार विभागाच्या आढावा बैठकीत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी राज्यात विविध ठिकाणी मंडळामार्फत अदा करण्यात येणाऱ्या योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता संस्था निश्चित करणे आवश्यक आहे.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र: मावज-२०१७/प्र.क्र.३७६/३४ दि.२१.०५.२०१८ अन्वये गट-ड मध्ये इव्हेंट ॲड बीटीएल अंतर्गत कार्याचे नियोजन करणे, व्यवस्थापन करणे आणि अंमलबजावणी करणे यामध्ये सार्वजनिक कार्यक्रम, बैठक, प्रदर्शने, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्यानुसार मंडळामार्फतकल्याणकारीयोजनांचालाभ वाटपाच्या कार्यक्रम आयोजन करण्यासाठीमंडळाच्यासल्लागार मे. केपीएमजी या संस्थेने तयारकेलेलेEOI शासन निर्णयात गट-ड मध्ये इव्हेंट ॲड बीटीएल अंतर्गत Empanelled केलेल्या १२ संस्थांना दि.१०.१२.२०१८ रोजी पाठविण्यात आले. सदर संस्थांना गटनिहायEOI दि. १२.१२.२०१८ पर्यंत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.त्यानुसार दि.१२.१२.२०१८ रोजी खालील ०५ संस्थांनी EOI मंडळास सादर केले.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | विभाग |
|---|---|---|
| १. | मे. ग्राफिक क्रिएशन्स | नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती |
| २. | मे. ॲंगल ॲडव्हर्टायझिंग | नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती |
| ३. | मे. ओढ हिरवळीची मिडीया हाऊस प्रा.लि. | मुंबई कोकण विभाग |
| ४. | श्री ग्राफिक | नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती |
| ५. | मे. राजकारणे मिडीया वेव्ह | नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती |

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच इत्यादी वाटपाच्या कार्यक्रम व्यवस्थापन (Event Mangment) करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी आयोजित समितीच्या दि.१२.१२.२०१८

रोजीच्या बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते. मा. कामगार आयुक्त मध्य प्रदेश येथील निवडणूक कामकाजात व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही. तसेच उद्योगसहसंचालक, मुंबई बैठकीस उपस्थित राहू शकले नाही.

| अ.क्र. | सदस्यांचीनावे | पदनाम | पद |
|---|---|---|---|
| १. | श्री. श्री. चु. श्रीरंगम | सचिवतथामुख्यकार्यकारीअधिकारी | सदस्यसचिव |
| २. | श्री. शशांकसाठे | उपसचिव (कामगार) विभाग | सदस्य |
| ३. | श्री. अशोकतांबे | लेखाअधिकारी | सदस्य |

उक्त ०५ संस्थांनी कार्यक्रम व्यवस्थापनाबाबतचे तांत्रिक सादरीकरण दि.१२.१२.२०१८ रोजी दुपारी ३.०० वा. समितीसमोर करण्यात आले होते. सदर सादरीकरणाबाबत तपशीलवार बाबनिहाय चर्चा करण्यात आली सविस्तर चर्चेअंती समितीने खालील प्रमाणे गुणांकन देण्यात आले.

अ) नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या विभागासाठी आलेल्या इच्छुक संस्थांना सादरीकरणासाठी समितीने दिलेले गुणांकन खालील प्रमाणे:-

| अ. क्र. | तांत्रिक सादरीकरण | कमाल चिन्ह | मे. ग्राफिक क्रिएशन्स | मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग | श्री ग्राफिक | मे. राजकारणे मिडीया वेव्ह |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थाचा अनुभव | ३० | २५ | ३० | ०० | ०० |
| २. | प्रमुख स्त्रोत | ३० | २५ | ३० | ०० | ०० |
| ३. | कार्यप्रणाली | ४० | २८ | ३३ | ०० | ०० |
| | एकूण गुण | १०० | ७८ | ९३ | ०० | ०० |
| | गुणांकनानुसार पात्र/ अपात्र | | पात्र | पात्र | अपात्र | अपात्र |

नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या विभागाकरीता सादर केलेल्या EOI च्या छाननीअंती समिती समोर पात्र संस्थानी केलेले सादरीकरण व तांत्रिक गुणांकनासह त्यांचे एकूण गुणांकन खालील प्रमाणे:-

| तांत्रिक मूल्यांकन | मे. ग्राफिक क्रिएशन्स | मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग | श्री ग्राफिक | मे. राजकारणे मिडीया वेव्ह |
|---|---|---|---|---|
| तांत्रिक मूल्यांकनव सादरीकरण | ७८ | ९३ | ०० | ०० |
| ७०% च्या तांत्रिक गुण | ५५ | ६५ | ०० | ०० |

ब) मुंबई, कोकण विभागासाठी आलेल्या इच्छुक संस्थांना सादरीकरणासाठी समितीने दिलेले गुणांकन खालील प्रमाणे:-

| अ. क्र. | तांत्रिक सादरीकरण | कमाल चिन्ह | मे. ओढ हिरवळीची मिडीया मिडीया हाऊस प्रा.लि. |
|---|---|---|---|
| १. | संस्थांचा अनुभव | ३० | १० |
| २. | प्रमुख् स्त्रोत | ३० | २५ |
| ३. | कार्यप्रणाली | ४० | २६ |
| | एकूण गुण | १०० | ६१ |
| | गुणांकनानुसार पात्र/अपात्र | | पात्र |

मुंबई, कोकण विभाग या विभागाकरीता सादर केलेल्या EOI च्या छाननीअंती समिती समोर पात्र संस्थानी केलेले सादरीकरण व तांत्रिक गुणांकनासह त्यांचे एकूण गुणांकन खालील प्रमाणे:-

| तांत्रिक मूल्यांकन | मे. ओध हिरावालीची मिडीया हाऊस प्रा.लि. |
|---|---|
| तांत्रिक मूल्यांकनव सादरीकरण | ६१ |
| ७०% च्या तांत्रिक गुण | ४२.७ |

उपरोक्त तपशीलानुसार पात्र ठरलेल्या संस्थैपेकी नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर या विभागासाठी मे.ग्राफीक क्रिएशन व मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. यांचे दरपत्रक उघडण्यात यावे. तसेच, मुंबई व कोकण विभागासाठी मे. ओढ हिरवळीची मिडीया मिडीया प्रा.लि. यांचे दरपत्रक उघडण्यात यावे असा निर्णय समितीच्या दि.१२.१२.२०१८ रोजीच्या बैठकीत घेतला होता.

उक्त बाबीस अनुसरून दि.१३.१२.२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता समिती सदस्य व संस्थांचे प्रतिनधी समक्ष कार्यक्रम व्यवस्थापना बाबतच्या EOI चे दर लिफाफा उघडण्यात आला.

त्यानुसार पात्र ०३ संस्थानी सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| अ. क्र. | संस्थांचे नाव | | सादर केलेले दर रू. |
|---|---|---|---|
| १. | मे. ग्राफिक क्रिएशन्स | नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर | ४८,५६,८०१/- |
| २. | मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग | नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर | ४६,४८,४९२/- |
| ३. | मे. ओढ हिरवळीची मिडीया मिडीया हाऊस प्रा.लि. | मुंबई व कोकण | ४७,२३,७८१/- |

उपरोक्त पात्र ०३ संस्थांनी सादर केलेला दराचा लिफाफा छाननी करण्यासाठी मे. केपीएमजी या संस्थेकडे वर्ग करण्यात आला. मे. केपीएमजी यांनी छाननी करून गुणांकनानुसार पात्र संस्था व प्राप्त दरानुसार अहवाल मंडळास सादर केला. (प्रत संलग्न)

**EOI छाननीअंती समिती समोर पात्र संस्थानी सादर केलेल्या दरास अनुसरून EOI मधील ३.२.२ नुसार गुणांकन खालील प्रमाणे:-**

| तांत्रिक मूल्यांकन | मे. ग्राफिक क्रिएशन्स | मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग | मे. ओढ हिरवळीची मिडीया |
|---|---|---|---|
| सादर केलेले दर | ४८,५६,८०१/- | ४६,४८,४९२/- | ४७,२३,७८१/- |
| ३०% of weightage | २९ | ३० | ३० |

**Composite Score**

**नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या विभागासाठी**

| Bidder | Technical score | Financial Score | Weighted Technical Score | Weighted Financial Score | Composite Score |
|---|---|---|---|---|---|

| A | B | C | D | E | F |
|---|---|---|---|---|---|
| Graphic Creation | 78 | 96 | 55 | 29 | 83 |
| Angle Advertising | 93 | 100 | 65 | 30 | 95 |

EOI मधील ३.२.२ मधील मुद्या क्र.०३ नुसार स्तंभ F मधील सर्वात जास्त Composite Score असलेल्या संस्थेस महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकरी मंडळामार्फत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच इत्यादी वाटपाकरीता कार्यक्रम व्यवस्थापन करीता मे. ॲंगल ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. यांना पात्र ठरविण्यात आले आहे.

**मुंबई व कोकण विभागासाठी**

| Bidder | Technical score | Financial Score | Weighted Technical Score | Weighted Financial Score | Composite Score |
|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E | F |
| OADH Hirawalichi Media House PVT ltd | 61 | 100 | 42.7 | 30 | 72.7 |

EOI मधील ३.२.२ मधील मुद्या क्र.०३ नुसार स्तंभ F मधील सर्वात जास्त Composite Score असलेल्या संस्थेस महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकरी मंडळामार्फत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच इत्यादी वाटपाकरीता कार्यक्रम व्यवस्थापन करीता मे. ओध हिरावालाची मिडीया प्रा.लि. यांना पात्र ठरविण्यात आले आहे.

खरेदी समितीच्या दि.१३.१२.२०१८ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले

१) नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या विभागासाठी मे. ॲंगल ॲडव्हर्टायझिंग लि. पुणे यांचे दर रू. ४६,४८,४९२/- स्विकृत करण्यात यावे.

२) मुंबई व कोकण विभाग विभागासाठी मे. ओढ हिरवळीची मिडीया प्रा.लि.यांचे दर रू.

४७,२३,७८१/- स्विकृत करण्यात यावे.

उक्त बाबींच्या अनुषंगाने खालील प्रमाणे संस्था व दर निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | संस्था | विभाग | प्रति कार्यक्रम दर |
|---|---|---|---|
| १. | मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा.लि. पुणे | नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती | रू.४६,४८,४९२ |
| २. | मे. ओढ हिरवळीची मिडीया प्रा.लि | मुंबई व कोकण | रू.४७,२३,८७१/- |

उपरोक्त संस्थेकडून कार्यक्रमाचे व्यवस्थापन करण्यास व खरेदी समितीने स्विकृत केलेल्या मान्यतेचा प्रस्ताव दि.१८.१२.२०१८ रोजी शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास दि. २१.१२.२०१८रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उक्त शासन मान्यतेनुसार चंद्रपूर येथे दि.२४.१२.२०१८ रोजी व पनवेल येथे दि.१०.०१.२०१९ रोजी मंडळाच्या योजनांचे लाभ वाटप, ओळखपत्र वाटप, सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटप सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे आयोजन संबंधित संस्थांनी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

मंडळाच्या वतीने नोंदीत बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजना, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच इत्यादी लाभ वाटपाकरीता आयोजित कार्यक्रम व्यवस्थापनाकरीता निवड केलेली संस्था, निश्चित केलेले दर व लाभ वाटप कार्यक्रमाच्या आयोजनाची कार्यवाही मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता.

त्यानुसार दि.२४.१२.२०१८ रोजी चंद्रपूर येथे व दि.०७.०१.२०१९ रोजी पनवेल येथे विविध योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सदर लाभ वाटपाकरीता आयोजित कार्यक्रम व्यवस्थापनाकरीता निवड केलेली संस्था, निश्चित केलेले दरास मंडळाने मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(१०)/२०१८:** मंडळाच्या वतीने नोंदीत बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप, सुरक्षा संच व अत्यावश्यक सच वाटपाकरीता आयोजित कार्यक्रम व्यवस्थापना करीता निवड केलेली संस्था, निश्चित केलेले दर व लाभ वाटप कार्यक्रमाच्या आयोजनाची कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, जालना (भोकरदन), नागपूर, पुणे व लातूर जिल्हयातील प्रस्तावित कार्यक्रमासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार मंडळ स्तरावरून उचित कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.११ :- मंडळाच्या कामकाजाच्याअनुषंगाने वरिष्ठ कार्यालय, विभागीय कार्यालयांना संपर्क साधण्याकरीता video conference संच व अनुषंगिक बाबी शासनाच्या GEM पोर्टल वरून खरेदी करण्यास मान्यता देणे बाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व कल्याणकारी योजनांचा लाभ वाटपाबाबतची कार्यवाही जिल्हा कार्यालया कडून करण्यात येते. बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मा. मंत्री महोदय, कामगार विभाग, मा. प्रधानसचिव, कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मंडळ स्तरावरून वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. मंडळाकडून प्रस्तावित योजना राबविताना येणाऱ्या अडी-अडचणी, त्याबाबतचे मार्गदर्शन या करीता क्षेत्रिय कार्यालया कडून विचारणा करण्यात येते. सदर कामकाजाच्या अनुषंगाने मा. मंत्री महोदययांचे कार्यालय, कामगार विभागमा. प्रधानसचिव, कामगार विभागयांचे कार्यालय, मंडळ कार्यालय व विभागीय कार्यालयात Video Conference असणे आवश्यक आहे. याबाबत मा. प्रधान सचिव यांच्या स्तरावरूनही निर्देश प्राप्त झालेले आहेत.

मा. मंत्री महोदय, कामगार यांचे मंत्रालयीन दालन, मा. प्रधानसचिव, कामगार यांचे मंत्रालयीन , मा. कामगार आयुक्त् आणि मंडळाच्या पाच विभागीय कार्यालयामध्ये (कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर) Video Conference व खालील अनुषंगिक बाबीशासनाच्या GEM पोर्टल वर खरेदी करणे बाबत मंडळाच्या मान्यतेस अधिन राहून निविदा प्राक्रिया राबविण्यात आली.

अ. 10 port MCU, Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134268

ब. 1+3 End Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134192

क. Point to Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134122

ड. LED 55 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136623

इ. LED 32 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136728

सदर खरेदीस मंडळाच्या आगामी बैठकीत मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

Video Conference संच खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांचे GEM पोर्टल वरुन दि. १०.१२.२०१८ व दि. १३.१२.२०१८ रोजी Online Bid करण्यात आले होते. सदर Online Bid च्या प्रतिसादात प्राप्त निविदांची छाननी मंडळाचे ई-गव्हर्नस सल्लागार मे.

केपीएमजी या संस्थेने केली व त्याबाबतचाअहवाल दि.०४.०१.२०१९ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला.

मंडळाचे ई- गव्हर्नन्स सल्लागार मे. केपीएमजीचे प्रतिनिधी सदर बैठकीस उपस्थित होते. मे. केपीएमजी या मंडळाच्या सल्लागार संस्थेने सादर केलेल्या तांत्रिक निविदांच्या छाननीच्या अहवालाचे बैठकीत सादरीकरण करण्यात आले.

सादरी करणाच्या आधारे खरेदी समितीने चर्चे अंती पात्र / अपात्र निविदा बाबत निर्णय घेण्यात आला. बाबनिहाय सदर निविदांचा पात्र / अपात्र बाबतचा तपशील खालील प्रमाणे

**अ. 10 port MCU, Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134268**

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | पात्र निविदाकारांचे दर रू. | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मे. ब्रेनवेव आयटी सर्व्हिसेस प्रा.लि. | पात्र | ७,४५,०००/- | L१ |
| २. | मे. ग्लोबल वन टॅक्नोलॉजी प्रा.लि. | पात्र | ७,५८,०००/- | L२ |
| ३. | मे.पेस बिझनेस मशीन प्रा.लि. | पात्र | ७,७८,८००/- | L३ |
| ४. | मे. एमएसएम नेटवर्कस एन्टरप्रायझेस | पात्र | ८,००,०००/- | L४ |
| ५. | मे.पिपल लिंक युनिफाईड कम्युनिकेशन प्रा.लि. | पात्र | ८,४५,४९९/- | L५ |
| ६. | मे. अवेन्स ग्लोबल टेक कन्सल्टन्सी प्रा.लि. | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | -- |

**ब. 1+3 End Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134192**

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मे. ग्लोबल वन टॅक्नोलॉजी प्रा.लि. | पात्र | ४,६५,०००/- | L१ |
| २. | मे. अवेन्स ग्लोबल टेक कन्सल्टनन्स ीप्रा .लि. | पात्र | ४,६५,३००/- | L२ |
| ३. | मे. एमएसएम नेटवर्कस एन्टरप्रायझेस | पात्र | ४,६८,०००/- | L३ |
| ४. | मे. भारत आयटी सर्व्हिसेस लिमिटेड | पात्र | ४,७७,०००/- | L४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | मे.पेस बिझनेस मशीन प्रा.लि. | पात्र | ४,८६,७५०/- | L५ |
| ६. | मे. ब्रेनवेव आयटी सर्व्हिसेस प्रा.लि. | पात्र | ४,९५,०००/- | L६ |
| ७. | मे.पिपल लिंक युनिफाईड कम्युनिकेशन प्रा.लि. | पात्र | ५,०८,६०८/- | L७ |

**क. Point to Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134122**

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मे.पिपल लिंक युनिफाईड कम्युनिकेशन प्रा.लि. | पात्र | ५,६०,५००/- | L१ |
| २. | मे. ब्रेनवेव आयटी सर्व्हिसेस प्रा.लि. | पात्र | ५,७०,०००/- | L२ |
| ३. | मे. अवेन्स ग्लोबल टेक कन्सल्टनन्सी प्रा.लि. | पात्र | ५,७४,०००/- | L३ |
| ४. | मे. ग्लोबल वन टॅक्नोलॉजी प्रा.लि. | पात्र | ५,७५,०००/- | L४ |
| ५. | मे. भारत आयटी सर्व्हिसेस लिमिटेड | पात्र | ६,१०,०००/- | L५ |
| ६. | मे.पेस बिझनेस मशीन प्रा.लि. | पात्र | ६,१९,५००/- | L६ |
| ७. | मे. एमएसएम नेटवर्कस एन्टरप्रायझेस | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | -- |

**ड. LED 55 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136623**

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मे. लक्ष्मी सेल्स कॉर्पोरेशन | पात्र | १,४६,५५०/- | L१ |
| २. | मे. ऑरबीट इन्फोटेक | पात्र | १,४९,८५०/- | L२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | मे. कृष्णा सेल्स | पात्र | १,४९,९७०/- | L३ |
| ४. | मे. वी.के कॉम्प्युटर्स | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ५. | मे. स्काय इलेक्ट्रोनिक्स प्रा.लि. | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ६. | मे. राधे कृष्णा लॅपटॉप अॅण्ड मोबाईल सर्व्हिसेस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ७ | मे. वास्ट एंटरप्रायझेस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |

**इ. LED 32 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136728**

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | मे. वास्ट एंटर प्रायझेस | पात्र | ७९,९९५/- | L१ |
| २. | मे. एबीसी इन्फोसिस्टम प्रा.लि. | पात्र | १,०४,७५०/- | L२ |
| ३. | मे. सॅव्ही व्हिजन प्रा.लि. | पात्र | १,०५,२००/- | L३ |
| ४. | मे. लेझर टेलिसिस्टम प्रा.लि. | पात्र | १,०५,५००/- | L४ |
| ५. | मे. ड्रिमलॅंड | पात्र | १,०६,९५०/- | L५ |
| ६. | मे. दिल्ली स्टेशनरी मार्ट | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ७. | मे. मॅट्रीक्स सोल्युशन | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ८. | मे. कॉम्प्युटर एम्पायर | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ९. | मे. महा टॅक्नोलॉजीस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १०. | मे. केपीएस नेटवर्कस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| ११. | मे. सिंगाला स्टोअर | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १२. | मे. इडॅक्सिस सिस्टम इंडिया | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| | प्रा.लि. | | | |
| १३. | मे. वी.के. कॉम्प्युटर्स | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १४. | मे.लक्ष्मी सेल्स कॉर्पोरेशन | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १५. | मे. बी.जे. ॲटोमेशन | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १६. | मे. क्लासिक कॉम्प्युटर्स | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १७. | मे. महेश्वरी एंटरप्रायझेस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १८. | मे. मारूती एंटरप्रायझेस | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| १९. | मे. वथर्व | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| २०. | मे.रेलिसिस टॅक्नोलॉजी प्रा.लि. | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| २१. | मे. हिंदुस्तान कॉम्पयुटर सिस्टम | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| २२. | मे.प्रिफर्ड सेवन टेक्नोलॉजी | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| २३. | मे. प्रोफेशनल वेंचर | अपात्र | दर पत्रक उघडले नाही | |
| २४. | मे. एस.के. कम्युनिकेशन | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| २५. | मे. लॅप्स ॲण्डकॉम्प्स | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| २६. | मे. स्कायइलेक्ट्रोनिक्सप्रा.लि. | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| २७. | मे. मुकेशइलेक्ट्रोनिक्स | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| २८. | मे. महावीरए.वी. सोल्युशन | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| २९. | मे. ऑरबीटइन्फोटेक | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३०. | मे. गॅलेक्सीडिजिटल | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३१. | मे. अरिहंतइन्फोकॉमएलएलपी | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |

| अ.क्र. | निविदाकारसंस्था | पात्र/अपात्र | प्राप्त दर | स्थिती |
|---|---|---|---|---|
| ३२. | मे. केंद्रीयभंडारभोपाळ | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३३. | मे. ऑमट्रॉनपॉवरसिस्टमप्रा.लि. | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३४. | मे. एच.केएन्टरप्रायझेस | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३५. | मे. राधेकृष्णालॅपटॉप ॲण्डमोबाईलसर्व्हिसेस | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३६. | मे. साईडिस्ट्रीब्युशन | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३७. | मे. कृष्णासेल्स | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३८. | मे. झूमकॉम्प्युटर्स | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |
| ३९. | मे. डी.सी. इन्फॉटेक | अपात्र | दरपत्रकउघडलेनाही | |

उपरोक्त तपशीलातील पात्र निविदाकारांचे दर पत्रक उघडण्यात आले. पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या दर पत्रकाच्या आधारे खालील न्यूनत्तम निविदाकारांचे दर स्विकृती बाबतची शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला.

| अ. क्र. | बाब | अंदाजपत्रकीयर क्कम (रू.) | न्यूनत्तम निविदाधारक | दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| १. | 10 port MCU, Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134268 | १२,५०,०००/- | मे. ब्रेनवेवआयटीसर्व्हिसेस प्रा.लि. | ७,४५,०००/- |
| २. | 1+3 End Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134192 | ६,००,०००/- | मे. ग्लोबलवनटॅक्नोलॉजी प्रा.लि. | ४,६५,०००/- |
| ३. | Point to Point Dated 10.12.2018, Bid No. GEM/2018/B/134122 | ७,५०,०००/- | मे.पिपललिंकयुनिफाईड कम्युनिकेशनप्रा.लि. | ५,६०,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | LED 55 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136623 | २,२५,०००/- | मे. लक्ष्मीसेल्सकॉर्पोरेशन | १,४९,९७०/- |
| ५. | LED 32 Inch, Dated 13.12.2018, Bid No. GEM/2018/B/136728 | १,२५,०००/- | मे. लेझरटेलिसिस्टमप्रा.लि . | ७९,९९५/- |
| एकूण | | २९,५०,०००/- | | २०,००,४६५/- |

खरेदी समितीच्या उपरोक्त निर्णयास अनुसरून Video Conference संच व इतर अनुषंगिक बाबींच्या खरेदीस व खरेदी समितीच्या शिफारशी नुसार उपरोक्त ०५ बाबीं करीता प्रस्तावित संस्थांची निवड, दर स्विकृती व प्रस्तावित Video Conference संच व अनुषंगिक बाबींच्या खरेदी करीता अपेक्षित खर्च रू.२०,००,४६५/- अधिक वस्तू सेवाकर एवढया खर्चांस शासन मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दि.११.०१.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

तरी मंडळाच्या कामकाजाच्या अनुषंगाने वरिष्ठ कार्यालय, विभागीय कार्यालयांना संपर्क साधण्याकरीता खरेदीस व (अपेक्षित खर्च रू.२०,००,४६५/- अधिक वस्तू सेवाकर एवढया खर्चाचा) video conference संच व अनुषंगित बाबी शासना च्या GEM पोर्टल वरून खरेदी करण्याबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान करण्यात केली. वरिष्ठ कार्यालय, विभागीय कार्यालयांना संपर्क साधण्याकरीता खरेदीस व (अपेक्षित खर्च रू.२०,००,४६५/- अधिक वस्तू सेवाकर एवढया खर्चाचा) video conference संच व अनुषंगित बाबी शासना च्या GEM पोर्टल वरून खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता.

त्याबाबत मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी video conference संच व अनुषंगित बाबी शासना च्या GEM पोर्टल वरून खरेदी करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

**ठराव क्र. ४९(११)/२०१९: वरिष्ठ कार्यालय, विभागीय कार्यालयांना संपर्क साधण्याकरीता GEM पोर्टल वरून video conference संच व अनुषंगित बाबी च्या**

खरेदीस, संस्था निश्चितीस व प्राप्त न्यूनत्तम दरानुसार अपेक्षित खर्च रू.२०,००,४६५/- अधिक वस्तू सेवाकर एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.१२ :- अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य देणेबाबत शासन आदेश मंडळास अवगत करणेबाबत.**

राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी शहरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्याकरीतेचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कामगार विभागाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती, व सदर योजनेकरीता बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी मंडळ व कामगार विभागाने निश्चित करणेबाबत आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २९.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शहरी भागातील बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे.

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता लागू करणेबाबत क्षेत्रीय स्तरावर होत असलेली मागणी विचारात घेऊन सदर योजनेच्या अंमबजावणीकरीता योजनेच्या अटी, शर्ती व लाभाची रक्कम निश्चित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला, उप संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई व प्रकल्प संचालक डीआरडीए यांना दि.२३.०८.२०१८ रोजी बैठकीकरीता आमंत्रित करण्यात आली होती.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेल्या आहेत.

**योजनेचे नाव**:- नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणे.

**लाभार्थीची पात्रता :-**

१. मंडळाकडे नोंदीत व सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर अर्थसहाय्य देय राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांचे स्वतःच्या नावे महाराष्ट्र राज्यात पक्के घर (सिमेंट व वाळूने बांधलेले घर) नसावे.

३. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत योजनेच्या अनुदानाव्यतिरिक्त रू.८०,०००/- एवढा अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

४. ग्रामीण घरकुल योजनेस पात्र परंतु घरकुल बांधण्यासाठी स्वतःची जागा नसलेल्या बांधकाम कामगार, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभास पात्र राहील.

५. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेस लागू असणारे पात्रतेचे सर्व निकष सदरील लाभ घेण्यासाठी लागू राहतील.

६. घरकुलास पात्र लाभार्थीच्या कुटूंबातील कोणताही सदस्य नोंदीत बांधकाम कामगार असल्यास सदर लाभार्थी रू.८०,०००/- अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील. तसेच कुटूंबातील केवळ एकाच व्यक्तीस सदर अर्थसहाय्य देय राहील.

७. एकदा लाभ घेतल्यानंतर बांधकाम कामगार पुनश्च: लाभास पात्र राहणार नाही. तसेच सदर घरकुल पुढील ०५ वर्ष हस्तांतरीत/ विक्री करता येणार नाही तसे रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (Affidavit) सादर करावे लागेल.

**अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दत:-**

१. राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई ही संस्था सदर योजनेकरीता समन्वय संस्था (Nodel Agency) म्हणून कार्यरत राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांची जिल्हानिहाय यादी मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

३. नोंदीत बांधकाम कामगार प्रस्तावित योजनेकरीता पात्र ठरविल्यानंतर मंडळाकडून मंजूर अर्थसहाय्याची रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग या संस्थेकडे वर्ग करण्यात येईल.

४. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार राज्य व्यवस्थापन कक्षाकडून टप्पानिहाय अनुदान बांधकाम कामगारांच्या खात्यावर PFAMS प्रणालीद्वारे वर्ग करण्यात येईल.

५. सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी मंडळामार्फत केली जाईल व सदर प्रचार प्रसिध्दीचा खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेवर खर्ची टाकण्यात येईल.

यथाप्रस्तावित नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणेबाबत लाभाची पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्थसहाय्य वाटपाची रक्कम यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी. मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेनुसार पात्र लाभ धारकाला अर्थसहाय्य कसे मिळेल यांची माहिती दिली. त्यावर श्री. मगर यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सदर योजनेमध्ये समन्वय सस्था म्हणून न नेमता सदर योजनेची रक्कम कामगाराच्या बँक खात्यामध्ये थेट वर्ग करण्यात यावी असे नमुद केले. यावर मा. अध्यक्ष यांनी श्री. मगर यांनी नमुद केलेल्या प्रस्तावावर विचार करावा असे सांगितले. त्या नंतर मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. अध्यक्ष यांना कामगारांना योजनेचे रु. २ लाख कामगारांना कसे मिळतील याबाबतची प्रस्तावित कार्यपध्दती विषद केली.

बैठीस उपस्थित संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी त्यांच्या मार्फत सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या व सद्यस्थितीत कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. मंडळाची प्रधानमंत्री आवास योजना व त्यांची योजना एकत्रित कशा राबविता येवू शकतील याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळाने आपल्या नोंदीत सक्रीय (जिवित) कामगारांची यादी कक्षास द्यावी आणि राज्य व्यवस्थान कक्ष आपल्याकडील यादीशी ताळमेळ घेवून त्यांच्याकडील यादीत असलेले व पात्र बांधकाम कामगारांची यादी मंडळाला पाठवतील व मंडळ स्तरावरुन निधी कक्षाकडे वर्ग करावा लागेल याबाबत स्पष्ट करतांना संचालकांनी खुलासा केला की, आमच्या कक्षामध्ये आगामी तीन ते चार वर्षात वितरीत करावयाच्या अंदाजे १२ लक्ष लाभार्थ्यांची यादी निवडण्यात आली आहे. तथापी सदर निवडलेल्या यादीत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार असल्यास सदर बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ देता येईल अन्यथा लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागेल.

अशी प्रतिक्षा करणे बाबत सर्व मंडळ सदस्यांनी विरोध दर्शविला, मंडळाकडे निधी उपलब्ध असतांना पात्र लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळावा असे मत व्यक्त केले. या संदर्भात सविसतर चर्चेअंती मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, मंडळाचे सचिव व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी एकत्र बैठक घेवून आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेचा अभ्यास करावा व त्याच धर्तीवर नोंदीत बांधकमा कामगारांसाठी स्वतंत्र योजना तयारी करावी व ग्राम विकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत रु. २.५० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे असे प्रतिपादन केले.

योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मंडळस्तरावर एक कार्यकारी अभियंता व एम उप अभियंता नेमण्यात यावा व आणखी काय करता येईल हे बघावे असे सांगितले. त्यावर संचालक राज्य व्यवस्थान कक्ष यांनी असे नमुद केले की, सदर योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर सफल होण्यासाठी ग्रामिण भागामध्ये ग्रामसेवकांना प्रोत्साहन देता येवू शकेल.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते खालील ठरात घेण्यात आला.

**ठराव क्र. ४८(३)/२०१८: प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना तयार करावी ग्रामीण भागाकरीता प्रती लाभार्थी रु. २.५० लक्ष ऐवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. सदर योजनेच्या कार्यन्वयाकरीता मंडळ स्तरावर सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील एक पद निर्माण करावे. सदर पद मंडळामार्फत थेट नियुक्तीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. सदर योजनेच्या लाभार्थी निवडीच्या अटी शर्ती, योजना राबविण्याची पध्दती, अनुदान वितरणाची पध्दत निश्चित करुन योजना मंजूरीचा प्रस्ताव लवकरात लवकर शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

मंडळाने मंजूर केलेल्या उपरोक्त ठरावानुसार राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामविकास विभाग यांच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून योजनेचे प्रारूप तयार करण्यात आले. सदर योजना

मंजूरीचा प्रस्ताव मंडळाच्या दि.१७.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर शासन निर्णयाबाबत चर्चा करताना मंडळ सदस्य श्री. कुटासकर यांनी असे मत व्यक्त केले की, प्रति बांधकाम कामगार रू.१.५० लक्ष अर्थसहाय्य् मंडळामार्फत देण्यात येणार आहे. या संदर्भात ज्या बांधकाम कामगाराकडे स्वत:ची जमीन नाही त्यांना अतिरिक्त निधी देणे योग्य राहील. यावर मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांना स्पष्ट केले की, बांधकाम कामगाराने मंजूर रक्कम रू.१.५० लक्ष मधून घराचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर घराची जागा व अनुषंगिक बाबींकरीता रू.५०,०००/- थेट लाभार्थ्यांच्या बचत खात्यावर जमा करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे.

**ठराव क्र. ४९(१२)/२०१८:- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) करीता निर्गमित शासन आदेशानुसार कार्यवाही करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. १३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गतमुंबई शहरातील कार्यालयात बाहययंणेद्वारे नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांनाअतिरिक्त मोबदला देण्याबाबत.**

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग काआआ २०१३-प्र.क्र २३३/का-८ दि. १८.०६.२०१४ अनुसार कामगार आयुक्त कार्यालयाच्या अंतर्गत विविध कार्यालये तसेच नियंत्रणाखालील विविध मंडळे व अन्य क्षेत्रिय कार्यालयामध्ये गट क व गट ड या संवर्गातील पदांची कामे बाहययंत्रणे मार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या मे. ब्रिस्क् फॅसिलिटी प्रा. लि. व क्रिस्टल इनटिग्रेटेड सर्विस प्रा. लि. या दोन संस्थाचे पॅनेल मंजूर करण्यात आले आहे.

मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावरून मे. ब्रिस्क फॅसिलिटी प्रा. लि. यांचेसोबत कंत्राटी पध्दतीने गट क व गट ड संवर्गातील बाहय यंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठा करून त्याच्यामार्फत मंडळाची कामे करण्यासाठीदि. ०४.०८.२०१४ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. विविध कार्यालय तसेच नियंत्रणाखालील विविध मंडळे व अन्य क्षेत्रिय कार्यालयामध्ये गट क व गट ड या संवर्गातील पदांची कामे बाहययंत्रणे मार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी नवीन यंत्रणेची निवड होईपर्यंत मे. ब्रिस्क फॅसिलिटी प्रा. लि. यांना शासन पत्र दि. ११.०९.२०१७ अन्वये मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

मंडळाकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार, मे. ब्रिस्क फॅसिलिटी प्रा.लि. या संस्थेकडून मंडळाचे मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयाकरीता नियुक्त कर्मचारी, सदर कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येत असलेले मासिक पारिश्रमिक, मासिक पारिश्रमिकातील कपाती, संस्थेस अदा करण्यात येत असलेले सेवा शुल्क व त्यानुसार मासिक व वार्षिक खर्चाचा तपशील झोन निहाय (I, II, III) सोबतच्या प्रपत्रात सादर करण्यात येत आहे.

**मंडळाच्या मुख्यालयात नियुक्त कर्मचाऱ्यांपैकीकनिष्ठ लेखापाल, लघु टंकलेखक, लिपिक टंकलेखक या पदावरील १३ कर्मचारी माहे ऑगस्ट २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत, त्यांना अन्यत्र जास्त मोबदला मिळत असल्याने, मंडळाची सेवा सोडून गेले आहेत.**

ही वस्तूस्थिती विचारात घेता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयात कंत्राटी पद्धतीने कार्यरत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना सोबतच्या प्रपत्रात नमूद मासिक पारिश्रमिकाशिवाय काही विशेष पारिश्रमीक अदा करता येईल काय याबाबतची

तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी मंडळातील ३ अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. समितीने अन्य कार्यालयामध्ये अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीचा व त्यांना देण्यात येणाऱ्या पारिश्रमिकाचा अभ्यास करुन पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील कामगारांची विशेष भत्त्याची रक्कम जाहिर केली जाते. त्यानुसार सर्व परिमंडळाकरिता विशेष भत्त्यांच्या रक्कमेत दर ६ महिन्यानी वाढ होत आहे. तथापि, सदरची वाढ रु. १५०००/- प्रती महा वेतन असणाऱ्या पदांपुरतीच मर्यादीत आहे. त्यावरील वेतन असणाऱ्या पदांना अशी वाढ अनुज्ञेय नाही.

मंडळाच्या विचारार्थ पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यास शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग काआआ २०१३-प्र.क्र २३३/का-८ दि. १८.०६.२०१४ मध्ये नमूद झोन दराप्रमाणे पारिश्रमिक अदा करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयातील अनु.क्र. VIII नुसार सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचे प्रारंभिक वेतन वेतन टप्प्यावरील प्रारंभिक वेतनानुसार राहील. मात्र अनुभवी व शैक्षणिक अर्हतेच्या आधारे प्रारंभिक वेतनाच्या पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती करण्याची मुभा कार्यालय प्रमुखांना राहील. तसेच, अनु.क्र. XI नुसार बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याऱ्या एजन्सीने शासनाने निर्धारित केलेल्या वेतन दराप्रमाणे वेतन व वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्त्यांची अदायगी करणे बंधनकारक राहील.

बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेतांना नियमितपणे पदे भरल्यावर जितका खर्च झाला असता त्या खर्चाच्या किमान १० ते २५ टक्के इतकी बचत होणे अपेक्षित आहे.

मंडळाच्या मुख्यालयात अद्याप कोणतीही नियमित पदे भरण्यात आलेली नाही त्यामुळे मंडळ मुख्यालयातील सर्व कामकाज व विविध बैठका हे मुख्यालयातील बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यामार्फतच करण्यात येत आहे. बऱ्याचदा अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयात उशिरापर्यंत थांबून कामे करावी लागत आहेत.

शासन निर्णय दि. १८.०६.२०१४ मधील बाब क्र. XI द्वारे "बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याऱ्या एजन्सीने शासनाने निर्धारित केलेल्या वेतन दराप्रमाणे वेतन व वेळोवेळी लागू

असलेले कर व अनुज्ञेय भत्त्यांची अदायगी करणे बंधनकारक राहील." असे निर्देश देण्यात आलेले आहेत. तथापि, बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नेमके कोणते भत्ते अनुज्ञेय आहेत याबाबत शासनस्तरावरुन मार्गदर्शन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. शासनाच्या मार्गदर्शनानंतर मंडळ मुख्यालयात बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पारिश्रमिकांत वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

मंडळ मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. ४९(१३)/२०१८: शासन निर्णय उद्योग ऊर्जा, व कामगार विभाग दि.१८.०६.२०१४ अनुसार बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून घेतेवेळी सन २०१० मधील मुळ किमान वेतन दर ग्राह्य धरण्यात आले आहेत त्याऐवजी प्रचलित किमान वेतन दर विचारात घेऊन बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे सुधारित दरमहा वेतन निश्चित करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१४ :- मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेच्या नियुक्तीस पुढील मुदतवाढ देणेबाबत.**

राज्याचे प्रशासन अधिक गतीमान तसेच लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. कामगार विभागाचे एकात्मिक कामगार व्यवस्थापन प्रणाली (ILMS) राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यास अनुसरून माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.०१.०७.२०१४ नुसार सदर शासन निर्णयातील empanelled संस्थेपैकी ०४ संस्थांना दि.२०.१२.२०१६ रोजी मा. मंत्री महोदय कामगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न् बैठकीत सादरीकरणासाठी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीस प्रधान सचिव कामगार, कामगार आयुक्त, संचालक माहिती व तंत्रज्ञान विभाग व संचालक NIC यांनाही बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत प्रथम टप्प्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचे RFP Document तयार करणे, निविदा प्रक्रिया व निविदा प्रक्रियेशी संबंधित कामकाजाकरीता मे. केपीएमजी या सल्लगार संस्थेची नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता.

मे. केपीएमजी या संस्थेच्या नेमणूकीबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :- "मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP**

**Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."**

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये व मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार मे. केपीएमजी या आयटी कन्सल्टंट कडून १ सिनियर कन्सल्टंट व १ कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत खालील विविध योजनांच्या कामाचे RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

१. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटित कामगार मंडळ यांचे दोन वेगवेगळे सुविधा केंद्र स्थापन करण्याऐवजी एकच सुविधा केंद्र स्थापन करणे, सदर सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यालयाची स्थापना व एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी स्वतंत्र संस्थेची नेमणूक करण्याबाबतचे RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

२. उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करण्याकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

३. बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची (मोबाईल डे-केअर सिस्टम) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

४. बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबतच्या योजनेची RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

५. मंडळास बाहय संस्थेमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी संस्था निवडीकरीता RFP डॉक्युमेंटस तयार करणे.

मंडळाच्या उपरोक्त मान्यतेनुसार मे. केपीएमजी यांना RFP डॉक्युमेंटस तयार करण्याबाबत कळविण्यात आले होते.

दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.त्यानुसार मे. केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेवर सहा सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंडळाच्या बैठकीत नवीन योजना राबविणेबाबत वेळोवेळी पारित केलेले ठराव व सदर योजनांना शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेस अनुसरून करावयाच्या कार्यवाहीकरीता मे. केपीएमजी या सल्लागाराची सेवा यापुढेही आवश्यक असल्याने मे. केपीएमजी या सल्लागार संस्थेच्या नेमणूकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ च्या शासन आदेशान्वये दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदताढ देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मंडळाच्या योजनांचे RFP तयार होईपर्यंत मे. केपीएमजी यांना मुदत वाढ देण्यात यावी असे सुचविले. याबाबत मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी दिंनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात यावी असे प्रस्तावित केले, त्यास मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठरावः मे. KPMG या मंडळाच्या IT Consultant संस्थेच्या नियुक्तीस दिंनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

उक्त ठरावाच्या अनुषंगाने मे. केपीएमजी यांची नियुक्ती दि.३१.०३.२०१९ पर्यंत वाढविण्यात आलेली त्यांच्या मुदतवाढीबाबत मे.केपीएमजी यांना कळविण्यात आलेले आहे.

मंडळस्तरावर सद्यस्थितीत जिल्हा कामगार सुविधा केंद्र, एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे, मध्यान्ह भोजन योजना, सायकल वाटप, लेबर शेड उभारणे, आरोग्य तपासणी, मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करणे या योजना/ प्रकल्पाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मंडळास मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स संस्थेच्या सेवा आवश्यक आहेत. मे.केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेची माहिती व तंत्रज्ञान शासन निर्णय दि.१९.०३.२०१८ नुसार आगामी मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव क्र. ४९(१४)/२०१८: मंडळ स्तरावर प्रगतीपथावर असलेल्या व प्रस्तावित नवीन योजना राबविण्यासाठी मे. केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेच्या सेवेची आवाश्यकता आहे. मे.केपीएमजी या ई-गव्हर्नन्स सल्लागार संस्थेची माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून वेळोवेळी निर्गमित शासन आदेशानुसार दि. ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**आयत्या वेळचे विषय**

**विषय क्र.०१ :- मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग यांची विशेष नोंदणी अभियानाकरीता करण्यात आलेल्या नियुक्तीस मुदतवाढ.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांना नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती, प्रसार व प्रसिद्धीबाबतचा एकत्रित वार्षिक आराखडा तयार करणेबाबत दि. १५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त शासन निर्देश व त्यास अनुसरुन मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत सादर विषयावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव- मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती मोहिम राबविण्यासाठी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची आवश्यकता आहे. यास्तव माहिती व जनसंपर्क विभागामार्फत दर्शनी जाहिराती तयार करणे, वितरीत करणे, मोहिम आखणे व अंमलबजावणीचे कामाबाबत निश्चित कार्यपद्धतीची माहिती प्राप्त करावी व त्यानुसार कार्यवाही करावी. माहिती व जनसंपर्क विभागाने निश्चित केलेल्या पॅनेलवरील संस्थामार्फत प्रथम टप्प्यात प्रस्तावित रु. १० कोटी व भविष्यातील विविध माध्यमाद्वारे करावयाच्या प्रसिद्धीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच निर्देशनुसार जनजागृतीचा एकत्रित वार्षिक आराखडा तयार करून शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून दि.१६.१२.२०१७ रोजी विविध योजनांच्या जनजागृतीसाठी रु. २५.०६ कोटीचा वार्षिक आराखडा शासनास मंजूरीकरिता सादर करण्यात आला होता व सदर आराखडयास मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मंडळाने पारीत केलेला ठराव खालीलप्रमाणे-

**ठराव- मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना व बांधकाम कामगारांच्या नोंदणीत वाढ करण्यासाठी करावयाच्या प्रसार व प्रसिद्धीचा रु. २५.०६ कोटीचा मंडळाने दि.१६.१२.२०१७ रोजी शासनास सादर केलेला वार्षिक आराखडयास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तावित वार्षिक आराखडयातील विविध बाबींपैकी सोल लायन्ससी असलेल्या मे. राकेश ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि. मुंबई**

यांचेकडुन एस. टी. बसेस वरील बेस्ट बसेस वरील जाहिराती, मे. व्रित्ती सोल्युशन लि. कर्वे रोड, कोथरूड, पुणे यांचेकडुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकावरील ऑडीओ जाहिराती व सामान्य प्रशासन विभागाच्या १४.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमुद पॅनेलवरील संस्थांचे तांत्रिक सादरीकरण, प्रत्यक्षात काम करण्याची क्षमता, कलाकार संच, स्टोरी, थिम, पुर्वानुभव विचारात घेवुन किमान दर सादर करणाऱ्या संस्थेमार्फत मंडळाच्या योजनांची माहिती फिरत्या वाहनाद्वारे (मल्टीमिडीआ मोबाईल व्हॅन) प्रसार व प्रसिद्ध करण्यात यावी. सदर प्रसार व प्रसिद्धीचे स्वतंत्र प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावे, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदर सोल लयन्ससी शिवाय वार्षिक आराखडयातील अन्य माध्यमाद्वारे प्रसार व प्रसिद्धीचे स्वतंत्र प्रस्ताव शासनाच्या निर्देशानुसार कामगार विभागामार्फत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास सादर करून त्यानुसार प्रसार व प्रसिद्धीची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

मंडळाच्या ठरावानुसार शासन निर्णय दि.१४.०६.२०१४ मध्ये एम्पेनल केलेल्या संस्थेकडून EOI मागविण्यात आले. त्यास अनुसरून ०४ संस्थामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे व सादरिकरणाची छाननी मे. के. पी. एम. जी. या मंडळाच्या सल्लागार संस्थेमार्फत करण्यात आली. मे. के. पी. एम. जी यांनी सादरीकरणानुसार केलेल्या छाननीचा अहवाल दि.०२.०२.२०१८ रोजी मंडळास सादर केला. सादर केलेल्या अहवालानूसार मे वालिया अॅन्ड कंपनी, नवी दिल्ली अपात्र ठरले असुन उर्वरित ३ संस्थांचे दरपत्रक उघडण्यात आले. सदरच्या ३ संस्थांनी सादर केलेल्या सादरीकरणानूसार प्राप्त गुण व सादर केलेल्या दरानूसार न्युनतम दर असलेले मे. अॅन्गल अॅडव्हर्टायझिंग, पुणे (L-१) यांचा रु. ४,११,५५,१२४/- एवढया अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव शासन मान्यतेस दि.०७.०१.२०१८ रोजी सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास शासनाचे दि.०९.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर शासन मान्यतेनुसार साहित्य व मंजूर दराबाबत मे. अॅगल अॅडव्हर्टायझिंग प्रा.लि. सोबत करारनामा करण्यात आला होता. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

| The Rate (Payable) Quoted by M/s. Angle Advertising in Agreement | | | |
|---|---|---|---|
| | Particulars | Unit Measurement | All-Insurance Rate per Unit |

| | | | |
|---|---|---|---|
| A | **Multimedia Mobile Van** | | |
| १ | Mobile Van with ३ side branding on flex, sound system, LCD Plasma TV ४२ inch | Per day per Promoter | १५८२४ |
| २ | Promoters for leaflet and brochure distribution & Promoters at Registration Booth with promoters having experience of ४+ years in the field of approaching and capturing people with skill of providing information regarding social work with the help of informational leaflet. All promoters travelling and food for the period of deployment in included. | Per day per Promoter | १४१६ |
| B | **Registration Booth** | | |
| १ | Promoters for facilitation at registration Booths. Promoters with an experience of ३+ years in the field of data registration with professional knowledge in facilitation at registration booth. All promoters travelling and food for the period of deployment is included | Per day per Promoter | १४१६ |
| २ | Designing] Printing and Supply of Display standee printed on flex (Roll up standee ६ft) | Per No. | १७५२ |
| ३ | Registration Booth Designing] | Per No. Per | २६५५० |

| | | | |
|---|---|---|---|
| | Printing and Supply of Canopy with backdrop Banner on flex with MS structure (१८ft*६ft*७ft). | Month | |
| ४ | Table with Cover one Table cost including Transportation Charges for execution | Per No. Per Month | २०१८ |
| ५ | Chairs with handles one chair cost including Transportation Charges for execution | Per No. Per Month | ८५० |
| ६ | Designing] Printing and Supply of Display panel at construction sites printed on flex with MS stand (६ft*४ft) | Per No. | २२३० |
| ७ | Designing and Preparation and supply od leaflet/Brochures (A५ ) | Per No. | २ |
| C | **Computerization Center at Central Offices** | | |
| १ | Promoters for Computerization activity at office. Promoters with an experience of ३+ years in the field of data registration with professional knowledge in data entry. Scanning, Copying and computerization activities at office. Day to Day monitoring and compliance of the cloud based MIS Reporting Software to MBOCWW Board Office. All promoters traveling and food for the period of | Per Day per Promoter | १४१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | development is included. | | |
| २ | Table with Cover one Table cost including Transportation Charges for execution. | Per No. Per Month | २०१८ |
| ३ | Chairs with Handles one Chair cost including Transportation Charges foe execution | Per No. Per Month | ८५० |
| D | One time Charges | | |
| १ | Program opening ceremony(१०*२०) Mandap with stage, Carpet, sound system, backdrop, poium with mike, sound and light arrangement, chairs photography for १ day | Per Location | १८५४७७ |
| २ | e-inauguration §opening ceremony with live streaming at ६ location (४२" LCD Screen, Internet Connectivity, Electricity Supply and all other required items). | Lump Sum | १६९९२०० |
| ३ | Designing and Preparation and supply of Documentary film Minimum १० Minute. | Per No. | ५३८०८० |
| ४ | Designing and preparation of Creative॰s for newspaper Advertising and other creatives. | Lump Sum | ५९००० |

अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांच्या अधिक नोंदणीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानाचा तपशील-

| अनु. क्र. | अभियान | अभियान कालावधी | अभियान राबविण्यात आलेले जिल्हे | नोंदित झालेल्या बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | टप्पा -१ | दि.२३.०४.२०१८ ते दि. १०.०४.२०१८ | मुंबई (MMR), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, व नागपुर | २,२४,५७७ |
| २ | टप्पा -२ | दि.०४.०७.२०१८ ते दि. १४.०८.२०१८ | रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, चंद्रपूर, अहमदनगर, धुळे-नंदूरबार,परभणी, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, वाशिम | १,४३,२२७ |
| ३ | टप्पा -३ | दि. १९.११.२०१८ ते दि.१८.१२.२०१८ | औरंगाबाद, सातारा, सांगली, नांदेड लातूर,भंडारा, अकोला, जळगांव सिंधुदूर्ग, जालना, परभणी, हिंगोली, बीड उस्मानाबाद, वर्धा, गडचिरोली, बुलडाणा | १,१०,३२८ |

आगामी काळात अशाप्रकारचे मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व विविध कल्याणकारी योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रस्तावित अभियानाकरिता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठयाकरीता कार्यक्रमासाठी मे. अँगल ॲडव्हटायझिंग, पुणे यांना सदर कामांसाठी पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तव चर्चेअंती खालील ठराव पारित करण्यात आला

**ठराव क्र. ४९ (आयत्या वेळचा विषय १५/०१)/२०१९:- मंडळामार्फत भविष्यात नोंदणी, लाभ वाटप या संदर्भात कार्यवाही करताना अभियानाकरिता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठयाची आवश्यकता विचारात घेता मे. अँगल ॲडव्हटायझिंग, पुणे यांच्या मंडळाकडील नियुक्तीस मंडळासोबत केलेल्या कराराच्या अटी शर्तीनुसार व पुर्वीच्या मंजूर दराने पुढील ०१ वर्षाकरीता (माहे फेब्रुवारी २०२० पर्यंत) मुदतवाढ देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०२ :- मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या मुंबई-नागपूर-मुंबई विमान प्रवासाच्या आरक्षण रददकरणे संदर्भातील शुल्क रक्कम रु. ३४,५७८/- बाबत.**

मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मंडळ बैठकीमध्ये मा. अध्यक्ष यांना मंडळाच्या कामकाजासाठी व बैठकांसाठी नागपूर-मुंबई-नागपूर असा विमानाने प्रवास करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, मंडळाचे मा. अध्यक्ष मंडळाच्या कामकाजाकरीता व मंडळ बैठकीकरीता नागपूर-मुंबई-नागपूर असा विमान प्रवास करीत असतात. मंडळाचे मा. अध्यक्ष यांचे मंडळाच्या कामकाजाकरीता व मंडळ बैठकीकरीता खालीलप्रमाणे नागपूर-मुंबई-नागपूर विमान प्रवासाचे आरक्षण मे. सिध्दी विनायक ट्राव्हल्र्स यांजकडून करण्यात आले होते.

| अनु.क्र. | दिनांक | विमान प्रवासाचा तपशील |
|---|---|---|
| १. | ०१.११.२०१८ | मुंबई-नागपूर |
| २. | १२.११.२०१८ | नागूपर-मुंबई |
| ३. | ०२.०१.२०१९ | नागूपर-मुंबई |
| ४. | १८.०१.२०१९ | नागूपर-मुंबई |

परंतू, मा. अध्यक्ष यांनी अनिवार्य कारणास्तव उक्त नमूद रोजी विमान प्रवास केलेला नाही. त्यामुळे सदर विमान प्रवासाचे आरक्षण रद्द करण्यात आले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अनु.क्र. | दिनांक | प्रवास तपशील | आरक्षण रद्दीकरण शुल्क | बोर्डींग शुल्क | सेवा शुल्क | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०१.११.२०१८ | मुंबई-नागपूर | ३५५० | ७०० | २०० | ४४५० |
| २. | १२.११.२०१८ | नागूपर-मुंबई | १८११३ | ७०० | २०० | १९०१३ |
| ३. | ०२.०१.२०१९ | नागूपर-मुंबई | ३५५० | ७०० | २०० | ४४५० |
| ४. | १८.०१.२०१९ | नागूपर-मुंबई | ५७६५ | ७०० | २०० | ६६६५ |
| | | **एकूण रक्कम** | **३०९७८** | **२८००** | **८००** | **३४५७८** |

तरी, मा. अध्यक्ष यांच्या सदर विमान प्रवासाचे रद्दीकरणाचे शुल्क रक्कम रु. ३४५७८ /- संबंधित ट्रव्हलर्स कंपनीस अदा करण्याकरीता मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता.

**ठराव क्र. ४९ (आयत्या वेळचा विषय १५/०२)/२०१९:- मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या विमान प्रवासाच्या रद्दीकरणाचे शुल्क (Cancellation Charges) रक्कम रु. ३४,५७८ /- अदायगीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०३ :- कामगार आयुक्त कार्यालयातील सभागृहाच्या दुरूस्तीवरील खर्चास मान्यता देणेबाबत.**

मा. कामगार आयुक्त कार्यालयातील सभागृहात आयुक्त कार्यालयातील बैठकीशिवाय महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील विविध बैठका संपन्न होतात. या मध्ये मंडळ बैठक, मंडळ उपसमितीची बैठक, खरेदी समितीची बैठक, निविदा पूर्व बैठक व इतर आढावा बैठका संपन्न होतात. सदर bबैठकांना मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मा. मंडळ सदस्य, क्षेत्रिय अधिकारी, निविदेमध्ये इच्छुक व सहभागी निविदाकार उपस्थित राहतात याशिवाय कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था, विविध विषयांच्या बैठकीकरीता उपस्थित राहतात.

कामगार आयुक्त कार्यालयाचे सभागृह सुस्थितीत असणे आवश्यक आहे. कामगार आयुक्त यांचे कार्यालयाची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत झालेली नसल्याने सदर विभागामार्फत सभागृहाची देखभाल दुरूस्ती केली जात नाही.

सदर सभागृहातील फर्निचर, साऊंड सिस्टीम, रंगकाम, वातानुकूलीत यंत्रणा, टेबल, खुर्ची इत्यादीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे याकरीता अंदाजित रू.२५ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीमधून करणे प्रस्तावित आहे. सदर सभागृहाच्या दुरूस्तीवरील खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्र. ४९ (आयत्या वेळचा विषय १५/०३)/२०१९:- कामगार आयुक्त कार्यालयाच्या सभागृहातील फर्निचर, साऊंड सिस्टीम, रंगकाम, वातानुकूलीत यंत्रणा, टेबल, खुर्ची इत्यादीमध्ये सुधारणाकरीता अंदाजित रू.२५ लक्ष एवढया खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र .०४ :- आयकरावरील व्याज भरणा**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १५.०७.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील विषय क्र. ३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव :- मंडळाचे कार्यालय २००७ पासून स्थापन झाले असून मंडळामार्फत विहीत कामे वेगवेगळया यंत्रणेमार्फत करून घेण्यात आली आहेत. सदर कामासाठी देयके संबंधित यंत्रणेसाठी देत असताना २% टीडीएस बिलाच्या रक्कमेतून कपात करण्यात आली आहे. तथापि, सदर २% रक्कम इनकम टॅक्स विभागास रिटर्नद्वारे भरणा करण्यात आलेली नाही. इनकम टॅक्सच्या नियमांनुसार सदर रक्कम रू.१,४३,३९,८३२/-+ व्याजाची रक्कम+ दंडाची रक्कम अशी एकूण टीडीएसची रक्कम आयकर विभागास भरणा करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

सदर ठरावानुसार भरणा करण्यात आलेली रक्कम आयकर विभागाने परिगणना केल्याच्या तारखेनंतर भरणा केल्यामुळे दरम्यानच्या कालावधीत देय व्याजापोटी आयकर विभाग संदर्भ क्र. TDS word (1)(3)(4) चर्नीरोड मुंबई, यांचे दिनांक ४.१२.२०१८, संदर्भ क्र. TDS/1891/26Q/D/100031390958 दिनांक निरंक व संदर्भ क्र. 14110018/00681/CD दिनांक ४.१२.२०१८.चे नोटीसी अन्वये सन २०१२-१३ वर्षापासूनची आयकर विलंब शुल्क, इत्यादी रू ८,४१,३५७/-भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार विलंब शुल्कात वाढ होवु नये म्हणून मंडळाचे सनदी लेखापालांनी पडताळणी करुन दिलेल्या चलना प्रमाणे मंडळ मान्यतेस अधीन राहून विलंब शुल्काची एकूण रक्कम रु ४,८७,३९५/- आयकर विभागास दि.१३.१२.२०१८ रोजी भरणा करण्यात आलेली आहे व सदर प्रकरण बंद करण्याबाबत दिनांक १३.१२.२०१८ व दिनांक १९.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

उपरोक्त सन २०१२-१३ वर्षा पासूनचे आयकर विभागास भरण्यात आलेले विलंब शुल्क रक्कम रु ४,८७,३९५/- मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. ४९ (आयत्या वेळचा विषय १५/०४)/२०१९:- सन २०१२-१३ वर्षा पासूनचे आयकर विभागास भरण्यात आलेले विलंब शुल्क रक्कम रु ४,८७,३९५/- च्या अदायगीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |